सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २९० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पद्म पुरस्कारांची घोषणा

## महाराष्ट्रातील रघुवीर खेडकर, आर्मिडा फर्नांडिस आणि श्रीरंग लाड यांना पद्मश्री

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** प्रजासत्ताक दिनाच्या आदल्या दिवशी केंद्र सरकारने २०२६ च्या ४५ पद्म पुरस्कार विजेत्यांच्या नावांची घोषणा केली आहे. देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक अशी या पुरस्कारांची ओळख आहे. यामुळे हा पुरस्कार मिळणे ही गौरवाची बाब आहे. यंदा महाराष्ट्रातील चार जणांना पद्म पुरस्कार जाहीर झाला आहे. लोकनाट्य क्षेत्रातले तमाशा कलाकार रघुवीर खेडकर आणि कृषी क्षेत्रात कार्यरत असलेले श्रीरंग लाड तसेच पालघरमधील वारली संगीतकार भिकल्या लाडक्या ढिंका यांना पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत. आशियातील पहिली रक्तपेढी स्थापन करणाऱ्या मुंबईच्या आर्मिडा फर्नांडिस



यांनाही पद्म पुरस्कार जाहीर झाला आहे.

पद्मश्री पुरस्कार विजेते २०२६

आर्मिडा फर्नांडिस (मुंबई) - आशियातील पहिली रक्तपेढी स्थापन करण्यात मोलाचे योगदान

अंके गौडा- भारतातील सर्वात मोठ्या ग्रंथालयाची उभारणी

भगवानदास रायकवार- बुंदेली वॉर आर्टचे प्रशिक्षक म्हणून पारंपरिक युद्धकलेचे जतन व प्रसार

बृजलाल भट्ट (जम्मू-काश्मीर)- समाजसेवा व योगशिक्षणाच्या क्षेत्रातील योगदानासाठी

बुदरी ठाडी (छत्तीसगड)- नक्षलग्रस्त भागात शिक्षण पोहोचवण्याच्या कार्यासाठी.

चरण हेम्ब्राम (ओडिशा)- संथाली भाषेतील साहित्यनिर्मितीसाठी प्रसिद्ध लेखक.

चिरंजी लाल यादव (उत्तर प्रदेश)- पितळकलेत (ब्रास आर्ट) लोकांना प्रशिक्षण देऊन पारंपरिक हस्तकलेचा विकास

धार्मिक लाल चुन्नीलाल पांड्या- शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रातील योगदानासाठी

डॉ. कुमारस्वामी थंगराज-जेनेटिक्स (आनुवंशिक संशोधन) क्षेत्रातील महत्त्वपूर्ण संशोधनासाठी

डॉ. पद्मा गुरमीत (लडाख)- सोवा-रिग्पा या पारंपरिक वैद्यक पद्धतीच्या संवर्धनासाठी

कोण आहेत तमाशा कलाकार रघुवीर खेडकर ?


चार दशकांहून अधिक काळापासून रघुवीर खेडकर हे तमाशा रंगभूमीवर कार्यरत

तमाशा फडातील 'सोंगाड्या'ची भूमिका करणारे कलावंत आणि तमाशा फडचालक

'अखिल भारतीय तमाशा परिषद' या संघटनेचे अध्यक्ष

तरुणपणी तमाशात कथ्थक आणि लोककलेचे मिश्रण असलेले थाळीनृत्य करण्यासाठी लोकप्रिय

## दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार जाहीर



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिवंगत अभिनेते धर्मेंद्र सिंग देओल यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला गृह मंत्रालयाने २०२६ च्या 'पद्म पुरस्कार' विजेत्यांची ही यादी जाहीर केली असून त्यामध्ये अनेक कलाकारांचा समावेश आहे. भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला गृह मंत्रालयाने २०२६ च्या 'पद्म पुरस्कार' विजेत्यांची यादी जाहीर केली आहे. हे पुरस्कार कला, साहित्य, समाजसेवा, वैद्यकशास्त्र, शिक्षण, सार्वजनिक सेवा आणि इतर क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी आणि दीर्घकालीन प्रभावशाली कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान म्हणून प्रदान केले जातात. सिनेमा-संगीत या कला क्षेत्रातील दिग्गजांचा सन्मानही याअंतर्गत केला जातो. दिवंगत अभिनेते धर्मेंद्र सिंग देओल आणि सतीश शाह यांना मरणोत्तर पद्म पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. मंत्रालयाने जाहीर केलेल्या यादीमध्ये सिनेमा-संगीत क्षेत्रातील अनेक दिग्गजांची नावे समोर आली. दिवंगत अभिनेते धर्मेंद्र सिंग देओल यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित केले जाईल.

## ५ राज्यांत मुसळधार पावसाचा इशारा

नवी दिल्ली : देशभरात हवामानाचा लहरीपणा वाढताना दिसत असून कधी कडाक्याची थंडी तर कधी अचानक पावसाचा मारा असा अनुभव नागरिकांना येत आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागाने पुढील ४८ तासांसाठी आणखी एक महत्त्वाचा इशारा जारी केला असून देशातील काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पावसामुळे तापमानात २ ते ३ अंश सेल्सियसने घट होण्याची शक्यता असून थंडीचा जोर अधिक वाढणार असल्याचे सांगण्यात आले.










## सुटीची सूचना

प्रजासत्ताक दिनानिनिमित्त आज दि. २६ जानेवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर तरुण भारत कार्यालयास सुटी असल्यामुळे दि. २७ जानेवारी २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही. याची आमचे सर्व वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**

## 'वर्क फ्रॉम होम'च्या जाळ्या अडकवून लाखोंची फसवणूक

**ठाणे :** ऑनलाईन गुंतवणूक आणि घरबसल्या कामाच्या आमिषातून फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असून ठाणे शहरात असाच एक गंभीर प्रकार समोर आला आहे. सोशल मीडियावरील जाहिरातीद्वारे संपर्क साधत एका गृहिणीकडून सुमारे आठ लाख रुपयांची रक्कम उकळण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी वर्तकनगर पोलिस ठाण्यात तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सायबर पोलिसांकडून तपास सुरू आहे. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडिया किंवा मेसेजिंग पवरून येणाऱ्या गुंतवणूक व 'वर्क फ्रॉम होम' ऑफरबाबत सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अल्प कालावधीत मोठा नफा देण्याचे दावे करणाऱ्या ऑफरवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.






# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे हिंगोलीत राज्यस्तरीय अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ जानेवारी :** महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय अधिवेशन व वार्षिक आमसभा दि. २६ व २७ रोजी हिंगोली येथील रामलिला मैदानासमोरील महावीर भवन येथे संपन्न होणार आहे. महाराष्ट्रातून यासाठी शेकडो वृत्तपत्र विक्रेते उपस्थित राहणार असल्याची माहिती राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर यांनी दिली आहे.

अधिवेशनाचे उद्घाटन मंगळवार (दि.२७) सकाळी दहा वाजता अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा पालकमंत्री नरहरी झिरवळ यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आमदार तानाजीराव मुटकूळे असणार आ-हेत. स्वागताध्यक्ष म्हणून आ. हेमंत पाटील व हिंगोलीचे खा. नागेश पाटील आष्टीकर उपस्थित राहणार आहेत. यावेळी राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर, कार्याध्यक्ष बालाजी पवार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी, कोषाध्यक्ष राजेंद्र टिकार, ज्येष्ठ सल्लागार शिवगोंड आण्णा खोत यांच्यासह स्थानिक राजकीय नेते, अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित राहणार आ-हेत. अधिवेशनात वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्यांवर सखोल चर्चा करण्यात येणार असून स्वतंत्र विक्रेता मंडळाची अंमलबजावणी, पेन्शन योजना, आरोग्य व शिक्षण सुविधा, विक्रेत्यांची अधिकृत नोंदणी, पेपर स्टॉलसाठी जागा उप-लब्धता, शासकीय योजनांचा लाभ, वैद्यकीय सुविधा, विक्रेता भवन उभारणी तसेच रेल्वे व एस.टी. प्रवास सवलती आदी मुद्द्यांवर ठराव मांडण्यात येणार आहेत. अधिवेशनाचे आयोजन श्रमिक वृत्तपत्र विक्रेता संघटना, जिल्हा हिंगोली यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# लातूर जिल्ह्यात दोन्ही सेना अस्तित्वहिन..?

## सामान्यांना प्रश्न पडलाय.. सेनेचा वाघ डरकाळी फोडणे विसरला की काय?

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ जानेवारी :** कधीकाळी शिवसेना म्हटले की, सामान्य नागरिकांच्या डोळ्यांसमोर शिवसेनेच्या वाघाचे चित्र तरळून जायचे. मागच्या काही कालखंडात शिवसेनेबद्दलचा आदर, दर-ारा जणू संपल्यागत झाला आहे. त्यातच सेनेत दुफळी झाल्यानेही लातूर जिल्ह्यात उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि एकनाथ शिंदेंची सेना सद्यस्थितीत अस्तित्वहिन झाल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे सामान्यांच्या तोंडून आता शिवसेनेचा वाघ डरकाळी फोडणे विसरला की काय ? असे एक ना अनेक प्रश्न ऐकावयास मिळत आहेत.

लातूर जिल्ह्याच्या राजकारणात शिव-सेना एकसंघ असतानाही फारसे प्राबल्य दाखवू शकली नव्हती. परंतु लोकोपयोगी उपक्रमांत, सामान्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आक्रमकपणे रस्त्यावर उतरणारी शिवसेना आणि शिवसैनिक जुने जाणते लोक आजही विसरलेले नाहीत. सामान्यांच्या हितासाठी रस्त्यावर उतरण-ारा बाळासाहेबांचा शिवसैनिकही आता कालबाह्य झाल्यागत झाला आहे. मध्येच एकनाथ शिंदेंमुळे बाळासाहेबांच्या शिवसेनेत मोठी फूट पडली. सत्तेच्या अभिलाषेमुळे आजमितीस राजकारणात कधीही, काहीही होऊ शकते असे म्हटले जाते. एकसंघ असलेल्या शिवसेनेची शकले उडाल्याने सध्यस्थितीत दोन्ही शिवसेनांची अवस्था तशी बिकटच असल्यासारखी पाहायला मिळते.

कधीकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असणाऱ्या लातूर जिल्ह्यात केवळ शिव-सेनाच नाही तर अन्य कोणत्याही विरा-ेधी पक्षाचे अस्तित्व दखल घेण्याजोगे वाढणार नाही, याची खबरदारी काही नेतेमंडळींकडून घेतली गेली.

आज देशात प्रथम क्रमांकाचा राजकीय पक्ष असणाऱ्या भाजपलाही याठिकाणी मजबूत पाय रोवू देण्यापासून अनेक मार्गांनी रोखले जात असल्याची अनेक उदाहरणे आहेत. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख आणि गोपीनाथराव मुंडे या दोघांमधील जीवश्र्च कंठश्र्च मैत्री जगजाहीर होती. या दोन्ही नेत्यांनी मैत्रीत राजकारण येऊ दिले नसले तरी कायम एकमेकांना सांभाळून घेण्याचे काम तहहयात केल्याचे सर्वज्ञात आहे. या दोन्ही नेत्यांनंतर त्यांच्या वारसांनीही हा पायंडा पुढे चालू ठेवण्याचे काम केल्याचेही सर्वांनी पाहिले - अनुभवले आहे. मागच्या काही वर्षात जिल्ह्यात भाजपने भक्कमपणे आपली पायाभरणी केली आहे. त्यामुळे आज भाजप जिल्ह्यातही एक अग्रेसर राजकीय पक्ष म्हणून पुढे आला आहे. मात्र, कधीकाळी भाजपचा मोठा भाऊ असणाऱ्या शिवसेनेला जिल्ह्यात कधीच मोठी उभारी घेता आली नाही. सेनेकडे कोणत्याही भूमिकेवर खंबीर राहणारे नेतृत्व नसल्यानेही कदाचित असे घडले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सेनेत दुफळी झाल्यानेही मूळ शिवसेनेतील मंडळी इकडे - तिकडे विखुरली गेली. जे बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांशी बांधील होते, ते मूळ शिवसैनिक आजही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याशी एकनिष्ठ आहेत. कोणत्याही पदाची अपेक्षा न धरता काही मंडळी आजही तत्वांशी बांधील आहेत. अशा चेहऱ्यांमध्ये लातूरचे ज्येष्ठ शिवसैनिक त्र्यंबक गुरुनाथ स्वामी यांच्या सारख्यांचा समावेश आहे. या मंडळींना कोणी कितीही आमिषे दाखवली तरी बाळासाहेबांचे खंदे समर्थक असणारी ही मंडळी कायम तत्वनिष्ठ राहत आली आहेत. या मंडळींमुळेच बाळासाहेबांची मूळ शिवसेना आपले अस्तित्व टिकवून आहे, ही बाबही काही कमी नाही. महाविकास आघाडीमध्ये शिवसेनेचा सहभाग असला तरीही लातुरात उद्धव ठाकरेंची शिवसेना फारसा प्रभाव दाखवण्याकामी निष्प्रभ ठरली आहे, ही बाब मान्यच करावी लागेल.

जिल्ह्यात ना उद्धवसेना अस्तित्व वाढवू शकलीय ना शिंदेसेना, त्यामुळे शिवसेनेचा वाघ बदलत्या राजकीय वा-तावरणात डरकाळी फोडणे विसरून गेला की काय ? असा प्रश्न सामान्यांना भेडसावत असल्याचे दिसत आहे. सामान्य नागरिकांना २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण करणारी बाळासाहेबांची शिवसेना आजही हवी आहे, असे एकंदर परिस्थितीवरून निदर्शनास येत आहे.

## शाळांतील मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ जानेवारी :** राष्ट्र प्रथम अभियानांतर्गत शाळांतील मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. मुली स्वसंरक्षण करण्यास सक्षम व्हाव्यात म्हणून हा निर्णय घेतला असून, माजी सैनिकांकडून सैनिकी धडेही दिले जाणार आहेत.

शालेय शिक्षण विभागाचा हा निर्णय अत्यंत चांगला असून, पालक, विद्यार्थ्यांतून याचे स्व-ागत होत आहे. हल्ली शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना स्वतःचे संरक्षण करता आले पाहिजे. त्या बाहेर वावरताना सक्षम असल्या पाहिजेत. यासाठी शालेय शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला असून, प्रबोधनकारामार्फत विद्यार्थ्यांत राष्ट्रीय विचार आणि व्यक्तीमत्व विकासासाठी मार्गदर्शनही केले जाणार आहे.

प्रशिक्षणात शारीरिक सक्षमतेबरोबरच आरोग्याबाबतीतही मार्गदर्शन केले जाणार आहे. परिपूर्ण प्रशिक्षण देण्याचे नियोजन असून, यात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेवर जबाबदारी सोपवली आहे. उत्तम प्रकारे प्रशिक्षण देण्यासाठी खाजगी संस्थांचा देखील हातभार घेतला जाणार असून, मुलींना स्वसंरक्षणाबरोबरच मार्शल आर्ट, योग, बौद्धीक कौशल्य, सैनिकी शिक्षण देण्याचा मानस आहे. हल्ली शालेय विद्यार्थिनींवर अन्याय होण्याचे प्रकार वाढत असून, यातून मुलीच स्वतःचे स्वसंरक्षण कशा करतील, यावर भर दिला जाणार आहे. सध्या शालेय मुली देखील सक्षम होण्यास तयार असून, त्यांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन, प्रशिक्षण दिले तर त्यान निर्भयपणे वावरतील, असा शालेय शिक्षण विभागाचा विश्र्वास आहे.

## वाहतुकीचे नियम युवकांनी अंमलात आणावेत : सोनटक्के

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ जानेवारी :** वाहतुकीचे नियम सर्वांनी मिळून पाळणे आवश्यक असून, युवकांनी जोश व जल्लोषात वाहने चालू नये. रस्त्यावर घडणाऱ्या दुर्घटना टाळणे आवश्यक असून, बेफिकीर राहणे, मोबाईलवर बोलत वाहन चालवणे, अति वेगाने वाहन पळवणे, हेल्मेट न वापरणे, लायसन नसतांना गाडी चालवणे, सिग्नल पाहून वाहन चालवणे, जास्तीचे प्रवासी सोबत घेऊन नियमबाह्य वर्तणूक करणे ही काळजी घेण्याबरोबर आपली गाडी व्यवस्थित ठेवणे. नेहमीच सर्व्हिसिंसग करणे जागरूक असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रादेशिक परिवहन मं-डळ कार्यालयाचे अधिकारी शिवाजी सोनटक्के यांनी केले.

येथील श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वती-ने आयोजित 'रस्ता सुरक्षा अभियान २०२६', सडक सुरक्षा व जीवन रक्षा या विषयावर शिवाजी सोनटक्के बोलत होते. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. वेदप्रकाश मलवाडे हे होते. यावेळी अभिजीत टिळे, डॉ. यु. टी. गायकवाड, प्रा. अनिता गायकवाड व राज्यशास्त्र विभाग प्रमुख व या स्पर्धेचे संयोजक प्रा. डॉ. शिवाजी मोहाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी रस्ता वाह-तूक सुरक्षिततेसाठी आवश्यक तो शपथविधी समारंभघेण्यात आला. यावेळी अभिजीत टिळे यांनी युवकांना शपथ देऊन देवदूत ही संकल्पना सांगितली. देवदूत म्हणजे अप-घाता प्रसंगी धावत जाऊन मदत करतो त्यांना देवदूत मानले जाते. अशा व्यक्तींचा सत्कारही परिवहन महामंडळ करते ही माहिती दिली. प्रा. डॉ. वेदप्रकाश मलवाडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रास्ताविक प्रा. डॉ. शिवाजी मोहाळे यांनी केले.

## एकदिवसीय औद्योगिक अभ्यास दौरा यशस्वी

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ जानेवारी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने येथील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे एकदिवसीय औद्योगिक अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. हा दौरा बँकिंग अँड इन्शुरन्स समिती व फॉरेन ट्रेड समिती यांच्या संयुक्त विद्यमाने झाला.

या औद्योगिक अभ्यास दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांना साखर उत्पादनाची संपूर्ण प्रक्रिया, अत्याधुनिक यंत्रसामग्री तसेच साखर उद्योगाशी संबंधित इथेनॉल, मळी यांसारख्या सहउत्पादनांची निर्मिती प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्याची व समजून घेण्याची संधी मिळाली. त्यामुळे विद्यार्थ्यांचे औद्योगिक व व्यावहारिक ज्ञान अधिक समृद्ध झाले. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यास दौरा झाला. या दौऱ्यास डॉ. निखिल व्यास, डॉ. रूपा गिल्डा, डॉ. लता जाधव, प्रा. ऐश्र्वर्या कुलकर्णी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग उपस्थित होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालय प्रशासन व समिती सदस्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. दिलीपराव देशमुख यांचा विद्यार्थ्यांशी संवाद या औद्योगिक भेटीदरम्यान माजी मंत्री तथा विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या साखर उत्पादनासंदर्भातील ज्ञानाबाबत त्यांनी माहिती घेतली तसेच मांजरा परिवारातील सर्व कारखान्यांमध्ये विद्यार्थ्यांचे नेहमीच स्वागत रा-हील, असे प्रतिपादन केले. त्यांच्या प्रेरणादायी संवादामुळे विद्यार्थी भारावून गेले.

## पहिल्याच प्रशिक्षणाकडे १८३ कर्मचाऱ्यांनी फिरवली पाठ

### निवडणूक विभागाकडून बजावल्या नोटिसा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ जानेवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर लातूर तालुक्यातील मतदान केंद्राध्यक्ष व निवडणूक कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण शुक्रवार, २३ जानेवारी रोजी दयानंद सभागृहात पार पडले. पहिल्याच प्रशिक्षणाला १८३ कर्मचारी गैरहजर राहिले असले, तरीही सुमारे २ हजार कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत प्रशिक्षण यशस्वीरीत्या पार पडले, हे या कार्यक्रमाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले. निवडणूक प्रक्रियेतील जबाबदाऱ्या, मतदान केंद्रावरील कामकाज, नियम व आचारसंहिता याबाबत कर्मचाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणासाठी २० झोनल अधिकारी व २० मास्टर ट्रेनर यांनी प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना सक्षम केले. या कार्यक्रमास निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे, नायब तहसीलदार गणेश सरोदे व सतीश कांबळे उपस्थित होते. प्रशिक्षण दोन टप्प्यांत घेण्याचे नियोजन केले असून, गैरहजर कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशिक्षणादरम्यान ४४३ कर्मचाऱ्यांचे टपाली मतदानासाठी अर्ज भरून घेण्यात आले, ज्यामुळे मतदान प्रक्रियेत सहभाग आणि पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे.

प्रशासनाकडून निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी काटेकोर तयारी करण्यात येत असून, लातूर तालुक्यात यंत्रणा पूर्णतः सज्ज होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## घर नसलेल्यांना कबाले देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ जानेवारी :** शहरात खाजगी व शासकीय जागेत झोपड्या घालून राहिलेल्या लोकांना कबाले देऊन घरकूल योजना राबवावी, अशी मागणी तालुक्यातील सलगरा (बु.) येथील बालाजी संस्थेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. लातूर शहरातील विलास नगर, यशवंत शाळेच्या बाजूस, समता नगर, बुद्ध गार्डनच्या भोवती श्रमिक लोकांची वस्ती आहे. शहरात गोरगरीब नागरिकांना घरे नाहीत, त्यांना किमान हक्काचे कबाले दिले तर त्यांच्या घरांचा प्रश्र्न मिटेल. महसूल प्रशासन व महानगरपालिकेने सर्व्हे करुन गोरगरीब, मजूर लोकांना हक्काचे कबाले द्यावेत. या गरजू लोकांना कबाले द्यावेत. बऱ्याच लोकांना इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकूल योजनेचा लाभ मिळत नाही. अशा लोकांना जिल्हाधिकाऱ्यांनी शहरात कबाले देण्याची सोय करावी, अशी मागणी संस्थेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

## लातुरात दुचाकी अडवून सोन्याची अंगठी लुबाडली; दिवसाढवळ्या वाटमारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ जानेवारी :** दुचाकीस्वाराला कट मारल्याचा बहाणा करत, धमकावत सोन्याची अंगठी लुबाडल्याची घटना लातूरमधील गरुड चौक परिसरात शनिवारी सकाळी दिवसाढवळ्या घडली. याबाबत विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात तिघा अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल केला.

नी बडे ळी न, ल ने. ला फिर्यादी ऋषीकेश हनमंत गायकवाड (वय २८, रा. कारेपूर, ह.मु, श्रीनगर, लातूर) हे शनिवार, २४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०:१० वाजण्याच्या सुमारास नांदेड रोडवरून जात होते. गरुड़ चौक परिसरातील एका हॉटेलसमोर नंबर प्लेट नसलेल्या काळ्या रंगाच्या हिरो स्प्लेंडर दुचाकीवरून आलेल्या तिघांनी फिर्यादीच्या दुचाकीला कट मारला आणि पाच ग्रॅमची सोन्याची आंगठी जबरदस्तीने हिसकावत पळ काढला.

दिवसाढवळ्या भररस्त्यात, चौकात घडलेल्या वाटमारीमुळे खळबळ उडाली. याबाबत विवेकानंद चौक ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. 'गाडी नीट चालवत नाही' असे म्हणत आरोपींनी ऋषीकेश गायकवाड यांना अडवले. त्यांना धमकावण्यास - सुरुवात केली. दरम्यान, आर-ोपींनी जबरदस्तीने त्यांच्या हातातील पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढून घेतली आणि पळ काढला.

## शेवग्याच्या शेंगाचे दर गगनाला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ जानेवारी :** भाजीसाठी वापरल्या जाणाऱ्या शेवग्याच्या शेंगाचे किरकोळ बाजारातील दर २८० प्रति किलो असल्याने त्या खरेदी करणे सर्वसामान्यांसाठी न परवडणारे झाले आहे. एवढा दर कधीच वाढल्याचे निदर्शनास आले नव्हते. २८० रूपये प्रति किलो दर हा फारच झाला असून, या दरवाढीची नागरिकांत चर्चा आहे. हल्ली बाजारात शेवग्याच्या शेंगा भाव खात असून, मागणीप्रमाणे पुरवठा होत नसल्याने दर वाढल्याचे बोलले जाते. बाजारात फारच कमी आवक होत असल्याने दर गगनाला भिडले आहेत. २८० रूपये प्रति किलोचा दर सर्वसामान्य, गोरगरीबांच्या खिशाला परवडणारा नाही. शेतकऱ्यांना मात्र, दिल-ासा मिळाला असून, कधी नव्हे तो एवढा दर मिळतोय. दरवाढीने किरकोळ खर-ेदीवर परिणाम झाल्याचे म्हटले जात आहे.

## सिध्देश्वर यात्रा महोत्सवाची गौरवशाली परंपरा वृंध्दिगत करावी

### पूर्वतयारी आढावा बैठकीत ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ जानेवारी :** ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून यात्रा महोत्सव-ाचे आयोजन करण्यात येते. गेल्या ७२ वर्षापासून हा यात्रा महोत्सव आयोजित करण्यात येत असून या वर्षी महोत्सवाचे ७३ वे वर्ष आहे. गत ७२ वर्षापासून सुरु असलेल्या या महोत्सवाला गौरवशाली परंपरा असून ही परंपरा अधिकाधिक वृंध्दिगत करावी, असे आवाहन देवस्थान समितीचे ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी केले.

श्री सिध्देश्वर देवस्थान परिसरात यात्रा महोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती. यावेळी ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे बोलत होते. या प्रसंगी विश्वस्त अशोक भोसले, रमेश बिसेन, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, बाबासाहेब कोरे, व्यंकटेश हालिंगे यांच्यासह प्रतिष्ठीत नागरिक व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर परजिल्ह्यासह कर्नाटक राज्यात श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सव पोह-ेचला असल्याचे सांगून या यात्रा महोत्सवाला हजारो भाविकांसह नागरीकांचा मोठा सहभाग नोंदवला जात असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी स्पष्ट केले. ७२ वर्षापासून सदर यात्रा महोत्सव भरविण्यात येत असून यात्रा महोत्सवाला यशस्वी करण्यासाठी लातूरसह परिसरातील



अनेक शिवभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते आपले योगदान देतात. त्याच बरोबर विश्वस्तही तितक्याच ताकदीने या सर्वांच्या पाठिशी उभे राहून यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी ताकद देत असतात. या महोत्सवाला सिध्देश्वर महाराजांच्या आशिर्वादाने व सर्वांच्या सहकार्याने गौरवशाली परंपरा लाभलेली असून ही परंपरा वृंध्दीगत करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी सांगितले.यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी विविध समित्या गठीत होत असून या समितीतील प्रत्येक सदस्यांनी योगदान द्यावे, असे आ-वाहन ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी केले.

यात्रा महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी या बैठकीत विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून यामध्ये झेंडा मिरवणूक, यात्रा स्टॉल, पशु व कृषी प्रदर्शन, कुस्ती, भोजन, भजन व किर्तन, अभिषेक, संरक्षक, स्वयंसेवक, विद्युत व पाणी पुरवठा, प्रसाद वाटप, पास दर्शन, रुद्राभिषेक व महिला स्पर्धा, रचना व सजावट आणि प्रसिध्दी समितीचा समावेश आहे. या समितीच्या माध्यमातून यात्रा महोत्सव यशस्वी करून महोत्सवाची गौरवशाली परंपरा जोपासली जाईल, असा विश्वास या समितीचे प्रमुख व समिती सदस्यांनी व्यक्त केला आहे.

## महाराष्ट्रात बिहार भवन नको, मुंबईत महाराष्ट्र भवन उभारावे

### व्ही. एस. पँथर संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ जानेवारी :** महाराष्ट्रात बिहार भवन बांधण्याऐवजी मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारण्यात यावे, अशी मागणी व्ही. एस. पँथर संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या सूचनेनुसार जिल्हा शाखेच्या वतीने, जिल्हाध्यक्ष शरद किनीकर यांच्या नेतृत्वाखाली ला-तूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातून उपचारासाठी तसेच विविध प्रशासकीय कामांसाठी मुंबई येथे येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत-ो. निवासव्यवस्थेअभावी सर्वसामान्य नागरिकांना खासगी लॉज व हॉटेलमध्ये महागड्या दराने थांबावे लागते. त्यामुळे मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारल्यास राज्यातील नागरिकांना सवलतीच्या दरात निवासाची सुविधा उपलब्ध होईल. महाराष्ट्र शासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारावे, अन्यथा व्ही. एस. पँथर्स संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष शरद किनीकर, विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रितम दंडे, कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे, विद्यार्थी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सूरज कांबळे, महादेव कांबळे, शहर सचिव रोहित दंडे, शहर संघटक रितेश जांभळे, शहर सदस्य सुदर्शन ओव्हाळ यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

## थोडक्यात...

### जळगांव येथून तिरुपती साठी विमान सेवा सुरु करा – केंद्रीय विमान वाहतूक मंत्र्यांना निवेदन



**सोयगाव:** उत्तर महाराष्ट्रातील जळगांव शहर ही एक मुख्य बाजारपेठ आहे.तसेच जळगांव जिल्ह्याला लागूनच असलेल्या धुळे, नंदुरबार,बुलडाणा,छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगांव,सिल्लोड तालुके मध्य प्रदेश राज्यातील बऱ्हाणपूर जिल्ह्यातून तिरुपती बालाजी येथे दर्शनास जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.परंतु जळगांव विमान तळावरून तिरुपती साठी विमान सेवा नाही त्यामुळे भाविकांची मोठी गैरसोय होत आहे.या संदर्भात भाजप जिल्हा युवा मोर्चा चिटणीस अजय पाटील यांनी केंद्रीय विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन जळगांव शहरातून तिरुपती साठी विमान सेवा सुरु करण्यात यावी त्या बद्दल मागणी चे निवेदन दिले. या मागणी बद्दल लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.

### दोन उभ्या बंद कंटेनरच्या हार्डवेअरच्या गोडाऊनला आग; अंदाजे ४० लाखाचे नुकसान

**बिडकीन :** छत्रपती संभाजीनगर ते पैठण रोडवरील असलेल्या प्रकाश नगर बिडकीन येथे दि २२ शुक्रवार रोजी रात्री आठच्या सुमारास साबण कारखान्याच्या बाजूला अनेक वर्षापासून दोन बंद पडलेले ४२ फूट लांबीचे कंटेनर उभी असून त्यामध्ये बिडकीन येथील बसस्टँड जवळील जमील हार्डवेअरचे मालक जमील शेख यांच्या दुकानाचे बॅटरी, स्प्रे पंप, जनरेटर,मोटर, शेतीची मशागतीचे साहित्य लाखाच्या सामानाला अचानक दोन्ही कंटेनरला रात्री आठच्या सुमारास आग लागून अंदाजे ३५ ते ४० लाखाचे साहित्य जळून कोळसा झाला आग विझविण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील पदमपुरा येथील अग्निशमन दलाच्या दोन बंबने साडे नऊ पर्यंत शर्थीचे प्रयत्न करून आग विझविली पुढील तपास बिडकीन पोलीस करीत आहे.

### जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणूक; दोन अर्ज अवैध,आमखेडा गटात एक आक्षेप

**सोयगाव:** जिल्हा परिषद,पंचायत समितीच्या निवडणुकीच्या उमेदवारी अर्जांची गुरुवारी (दि.२२) निवडणूक निर्णय अधिकारी रुपेश सिनगारे,सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मनीषा मेने यांच्या उपस्थितीत छाननी करण्यात आली या छाननी गोंदेगाव गटातील दोन अपक्ष उमेदवारांचे अर्ज अवैध ठरविण्यात आले.यामध्ये गोंदेगाव गटातील लक्ष्मीबाई जंगु जाधव यांनी नामनिर्देशन पत्रातील शपथेवर असलेली शपथ घेतली नव्हती तर दुसऱ्या अपक्ष उमेदवार सरलाबाई सुनील तातळे यांनी अनुसूचित जातीचे प्रमाण पत्र,जात वैधता व हमीपत्र जोडलेले नसल्याने हे दोन्ही अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी रुपेश सिनगारे यांनी अवैध ठरविले आहे दरम्यान आमखेडा गटातील भाजपच्या उमेदवार पुष्पा काळे यांच्या अर्जावर शिंदेसेनेच्या उमेदवार मोनाली पवार यांनी आक्षेप घेत प्रतिस्पर्धी उमेदवार पुष्पा काळे(भाजप) यांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याचा आक्षेप घेऊन राजकीय वातावरण चिघळले होते.

# जैन गुरुकुलात धार्मिक व शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २५ जानेवारी :** जैन गुरुकुल वेरूळ येथील गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिर मध्ये प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. परमपूज्य १०८ आचार्य विद्यासागर महाराज यांचे परम शिष्य निर्यापक मुनिश्री नियम सागर महाराज व सुपार्श्र्वसागर महाराज यांच्या मंगल आशीर्वादाने या नवीन अत्याधुनिक प्रयोगशाळेचे उद्धाटन संपन्न करण्यात येणार आहे. या निमित्ताने प्रशालेत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये २०२५ २६ या शैक्षणिक वर्षापासून प्रशालेत ११वी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे देखील उद्धाटन करण्यात येणार आहे. तसेच प्रशालेत सर्व सुविधांनी युक्त अशा आधुनिक विज्ञान प्रयोगशाळेचे उद्धाटन यावेळी करण्यात येणार आहे तसेच जैन त्यागी व व्रती यांच्या दृष्टीने पेय जल साठी भूमिगत एक लाख लिटर पावसाच्या पाण्याच्या साठवण दृष्टीने जलकुंभाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे.



जैन आयटीआय मध्ये दोन इलेक्ट्रिकल ट्रेड चेउद्धाटन देखील याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रशालाचे वतीने विद्यार्थ्याच्या अंगभूत गुणांना चालना मिळण्याच्या दृष्टीने विविध सांस्कृतिक व कवायत कार्यक्रमाचे देखीलआयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून पार्श्र्वनाथ ब्रम्हचारी आश्रम जैन गुरुकुल चे अध्यक्ष दिनेश गंगवाल तर ध्वजारोहक म्हणून संस्थेचे सहमंत्री गौतमजी ठोले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. याप्रसंगी प्रमुख अतिथी पदी डॉ पी एम दरकजी, ज्योतीजी गंगवाल, महावीरजी पाटणी, प्रकाशजी गंगवाल, अमोलजी पुर्णेकर, सुयोगजी पाटोदी, देवेंद्रजी शेट्टी, प्रकाशजी पापडीवाल यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे यावेळी परमपूज्य १०८ निर्यापक मुनी नियमसागर महाराज व सुपार्शसागर महाराज यांच्या मंगल प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष दिनेशजी गंगवाल, महामंत्री डॉ प्रेमचंदजी पाटणी मार्गदर्शक वर्धमानजी पांडे, सहमंत्री गौतमजी ठोले, कोषाध्यक्ष सुमितजी ठोले, शालेय समिती अध्यक्ष मदनलालजी पांडे, सदस्य निर्मल कुमारजी ठोले मुख्याध्यापक गुलाबचंदजी बोराळकर, प्राचार्य विजयजी रणनवरे, पर्यवेक्षक सुकुमारजी नवले, यांनी केले आहे अशी माहिती अतुल बांदे पियुष गंगवाल नरेंद्र अजमेरा यांनी दिली आहे.

## एमजीएममध्ये रोजगारक्षमता, व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण यशस्वीपणे संपन्न



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २५ जानेवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.जी.वाय.पाथ्रीकर कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमध्ये 'होप-बार्कलेज लाइफ स्किल प्रोग्राम : रोजगारक्षमता आणि व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण' हा अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

हा कार्यक्रम होप फाउंडेशन यांच्या सहकार्याने व बार्कलेज यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ करणे व व्यक्तिमत्व विकास साधणे हा होता. कार्यक्रमात एकूण ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या पाच दिवसीय प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना प्रभावी संवाद कौशल्य, भावनिक बुद्धिमत्ता, स्व:प्रेरणा, ताण-तणाव व्यवस्थापन, वेळ व्यवस्थापन, मुलाखत कौशल्य, ध्येय निर्धारण, संघर्ष व्यवस्थापन, करिअर विकास तसेच रस्ते सुरक्षा नियम व कायदे याबाबत मार्गदर्शन मिळाले. हे सर्व कौशल्ये विद्यार्थ्यांना उद्योगसज्ज बनवण्यासाठी उपयुक्त ठरली.

कार्यक्रमाचे विषय तज्ञ म्हणून होप फाउंडेशनचे श्री. सॅम्युअल पाटोले यांनी विविध उपक्रमांद्वारे पाच दिवस प्रशिक्षण दिले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.प्राप्ती देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या आयोजन समिती, अध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समन्वयक डॉ.भारत नाईकनवरे आणि श्री.आशिष भालेराव यांनी परिश्रम घेतले.

**विश्र्व हिंदू परिषद केंद्रीय प्रशिक्षण वर्ग प्रांत टोळी धर्म चार्य संपर्क विभाग पर्याग राज येथे दि. २५.२६.२७ जानेवारी या तीन दिवसीय प्रशिक्षण वर्ग शिबिर जिव्हेश्वर मिश्राजी विश्व हिंदू परिषद (केंद्रीय मंत्री.) अशोक तिवारी जी. वेरूळ या ठिकाणच्या नाथ आश्रम प्रमुख साध्वी अक्का महाराज यांच्यासह अनेक साधू संतांची प्रमुख उपस्थितीत सुरुवात**



## प्रजासत्ताक दिनी मुलांचा संविधानिक आवाज : बॉम्बे हायकोर्टात 'किडस्टिट्यूशन' सादर

तभा वृत्तसेवा

**पुणे, दि. २५ जानेवारी :** प्रजासत्ताक दिनानिमित्त निक या संस्थेच्या वतीने मुलांना आणि त्यांच्या कुटुंबांना केंद्रस्थानी ठेवत एक नाविन्यपूर्ण व सामाजिकदृष्ट्या अर्थपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत मुलांनी थेट बॉम्बे हायकोर्टात स्वतःचे 'किडस्टिट्यूशन' सादर करून आपल्या विचारांना, अपेक्षांना आणि हक्कांना प्रभावी व्यासपीठ दिले.

भारत अधिक आनंदी, संवेदनशील आणि दयाळू बनावा या व्यापक उद्दिष्टातून मुलांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमात मुलांचे आवडते निकटून पात्र चिकू आणि बंटी तसेच तरुण विचारवंतांच्या टीमने सक्रिय सहभाग घेतला. मुलांनी सादर केलेल्या 'किडस्टिट्यूशन'मध्ये दैनंदिन जीवनाशी निगडित मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले. खेळण्यासाठी अधिक मोकळी जागा, गृहपाठ व कामाच्या ताणात समतोल, सर्व सजीवांशी दयाळूपणाने वागणे तसेच काही विनोदी पण अर्थपूर्ण मागण्या यांचा त्यात समावेश होता.



हे 'किडस्टिट्यूशन' बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे अध्यक्ष अॅड. हर्षद वसंतराव निंबाळकर, उपाध्यक्ष अॅड. डॉ. उदय वरूंजीकरण, माजी अध्यक्ष अॅड. सुदीप पासबोला, माजी अध्यक्ष अॅड. विठ्ठल कोंडे देशमुख आणि सचिव शरद बागुल यांच्यासमोर सादर करण्यात आले.

यावेळी अॅड. हर्षद वसंतराव निंबाळकर यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना, मुलांनी संविधानाबाबत दाखवलेली जाणीव आणि पालकांसोबत गुणवत्तापूर्ण वेळ मिळण्याची गरज अधोरेखित केली. या उपक्रमातून मुलांच्या आवाजाला खऱ्या अर्थाने प्राधान्य देण्यात आले.

## कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूलची एकदिवसीय शैक्षणिक सहल संपन्न

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२५ जानेवारी :** येथील कै. बाबुरावजी काळे मराठी स्कूलची एकदिवसीय शैक्षणिक सहल अतिशय उत्साहात पार पडली. सहलीदरम्यान ऐतिहासिक अशा देवगिरी किल्ला,वेरूळ लेणी यांना भेट देण्यात आली.तसेच परतीच्या प्रवासात भद्रा मारुती दर्शन घेऊन सहलीची सांगता झाली.देवगिरी किल्ल्याचा वैभवशाली इतिहास तसेच जगप्रसिद्ध वेरूळ लेणीचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

देवगिरी एक अभेद्य ऐतिहासिक किल्ला असून तो महाराष्ट्रातील सात आश्र्चर्यांपैकी एक आहे.१२ व्या शतकात यादवांनी उभारलेल्या या किल्ल्याला मुहम्मद-बिन-तुघलकने 'दौलताबाद' (समृद्धीचे शहर) असे नाव दिले.२०० मीटर उंच डोंगरावर वसलेला हा किल्ला त्याच्या क्लिष्ट संरक्षण प्रणाली,चांद मिनार आणि चीनी महलासाठी प्रसिद्ध आहे.

या किल्ल्याची संरक्षण यंत्रणा अंत्यत आहे.याला कडेकोट तटबंदी,खोल खंदक आणि शत्रूला चकवा देणारे बोगदे आहेत.वेरूळ लेणी हे एक जागतिक वारसास्थळ असून, येथे ६ व्या ते १० व्या शतकातील बौद्ध,हिंदू आणि जैन धर्मांशी संबंधित ३४ लेणी आहेत.राष्ट्रकूट वंशाच्या काळातील हे आश्र्चर्यकारक एकाश्म कोरीव काम,विशेषतः 'कैलास मंदिर' (लेणे १६), एकाच खडकातून कोरलेले जगातील सर्वात मोठे मंदिर आहे.एकूण ३४ लेण्यांमध्ये १२ बौद्ध (१-१२), १७ हिंदू (१३-२९) आणि ५ जैन (३०-३४) लेणींचा समावेश आहे, जे धार्मिक सलोख्याचे प्रतीक आहेत,अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.



या सहलीसाठी शाळेचे १६९ विद्यार्थी तसेच मुख्याध्यापक प्रा.निलेश पाटील, उपमुख्याध्यापक प्रा. ज्ञानेश्वर एलिस, पर्यवेक्षक सागर घाटे, प्रा.योगेश काळे, शिक्षिका मनिषा पाटील,सीता पगार, जयश्री श्रीवास्तव, आशा गणगे, अंजली कथलकर, शीतल जाधव,रोहिणी पाटील,रुपाली मानकर यांसह लिपीक देवानंद आव्हाड, उमेश जाधव, शिपाई रमेश कंडारे,संजय डापके,सुनीता जाधव,लताबाई गायकवाड उपस्थित होते.

सर्वच विद्यार्थ्यांनी या ऐतिहासिक क्षेत्र भेटीचा मनमुराद आनंद घेतला. अनेक विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी आलेल्या परदेशी पर्यटकांशी इंग्रजी भाषेत संवाद साधला. त्यांच्या देशांची नावे जाणून घेतली. चीन,फ्रान्स,सिंगापूर येथील परदेशी पर्यटकांसमवेत फोटो घेतले.प्रवासासाठी ४ एस. टी.बसेस असल्याने सर्व प्रवास सुखरुप पार पडला. सहलीसाठी शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अधक्षा ज्योतीताई रंगनाथराव काळे,सचिव देवीनाताई काळे - भटकर,संचालक शिवदीप काळे,सुनयना काळे,प्रा.कमलेश काळे,ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश यादव, संस्थेचे व्यवस्थापक जय सोने यांनी सहभागी सर्व विद्यार्थी, शिक्षक यांना शुभेच्छा दिल्या होत्या.

# दगडे मारणाऱ्या मनोरुग्ण महिलेला पोलीसांनी केले माणुसकी वृध्द सेवालयात दाखल

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२५ जानेवारी :** जवाहरनगर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये दि.२३ शुक्रवार रोजी सकाळी ९.३० वा. सुमारास शिवाजीनगर गारखेडा परिसरातील जवाहरनगर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये एक मनोरुग्ण महिला हि जोरजोरात ओरडत नागरीकांना शिविगाळ करत दगडे मारताना च्या अवस्थेत मिळुन आलेली होती. महिला पोलीसांनी तीला पोलीस ठाणे जवाहरनगर येथे आणुन महिला पोलीस अंमलदारा मार्फत तिच्या राहत्या घराचा पत्ता विचारला असता ती चावा घ्यायला लागली. सदर महिला ही भोळसर स्वभावाची असुन उडवा-उडवीचे उत्तरे देत होती.तसेच तिने तिच्या नातेवाईकांबाबत कुठलीही माहिती पोलिसांना दिली नाही, पोलीस निरीक्षक सचिन कुभार यांनी बेवारस मनोरुग्णासाठि काम करणाऱ्या सु-लक्ष्मी सेवाभावी संस्थेशी संपर्क साधला व सदर महिलेची माहिती दिली कि यात आपन काही मदत करु शकता का. माणुसकी वृद्ध सेवालयाचे सर्वा सर्वे सुमित पंडित व पुजा पंडित यांनी त्या महिलेच्या पुनर्वसनासाठीची जबाबदारी स्वीकारली व पोलीसांच्या



मदतीने शासकीय रुग्णालयात

प्रभमोपचाकरिता दाखल केले. असता तीस मानसिक आजार असल्याने डॉ सांगितले व तीच्यावर उपचार सुरु केले. तरी तीला तीच्या सुरक्षेच्या दृष्टीने तात्पुरत्या निवाऱ्यासाठी माणुसकी वृध्द सेवालय गावंदरी तांडा येथे पुनर्वसनासाठी पोलीसांनी दाखल केले.या महिलेच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी झोन २, मशीन कल्याणकर सा.पो.आयुक्त,सचिन कुंभार पोलीस निरीक्षक जवाहर नगर,अतीश लोहकरे सहाय्यक पोलीस निरीक्षक,मारुती खील्लारे पोलीसउप निरिक्षक,नाना फुंदे, राजेश चव्हाण पो.अ, रेवती थोरले महिला पोलिस,माणुसकी समुहाचे सुमित पंडित,संचालीका माणुसकी वृध्द सेवालय पुजा पंडित आदिनी मदतकार्य केले.

**एक सामाजिक दायित्व व कर्तव्य म्हणुन मनोरुग्ण महिलेला पुनर्वसनासाठी मदत केली**

सदर महिलेला नातेवाईक शोध घेत असल्याने जवाहरनगर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये सापडलेल्या महिला नामे नंदिनी ला एक सामाजिक दायित्व व कर्तव्य म्हणुन मदत केली. ती मानसिक आजाराने पीडित आहेत. हा त्यांचा गुन्हा आहे का ? समाजाने वाळीत टाकलेल्या ह्या महिलांवर शारीरीक आत्याचार होत नसतील का ? अमानुष लोकांच्या वासनेच्या शिकार झालेल्या ह्या महिलांपासून जन्माला आलेल्या अनाथ मुलांचा भार कोणी सांभाळावा ? प्रश्र्न ह्या एका महिलेचाच नाही, तर अजून कितीतरी असतील. ज्या अशाच अबोध आपल्या देहाला बेशुद्ध मिरवत असतील समाजातील वाईट नजरे सामोर मग यांच्यासाठी एक मायेचं आपुलकीचं घर आहे का? समाजाच दायित्व काहीच नाही का ? जीवनात संकट सांगून येत नसतात. आपण आपल्या मर्यादा जर खरच वाढवल्या आणि मदतीचा हात सामाजिक संस्थाना लावला, जे अशा स्वरूपाचं काम करण्यास उभे होत आहेत. तेव्हा खऱ्या अर्थाने मनोरुग्णाचा मानसिकतेत स्थिरता येईल. आणि समाजाची खरी मानसिक विकृत वृत्ती नष्ट होईल.

**– सचिन कुंभार,वरिष्ठ पोलिस निरीक्षक जवाहरनगर**

## स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची ३६२ वी पुण्यतिथी होदेगेरीत संपन्न

तभा वृत्तसेवा

**खुलताबाद, दि. २४ जानेवारी :** होदेगेरी कर्नाटक,होदपराक्रम, युद्धनीतीतील बुद्धिमत्ता, उत्तम प्रशासन आणि स्वतंत्र राज्यकारभाराचे बीज छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात रोवणारे स्वराज्य संकल्पक, महाबली व महापराक्रमी शहाजीराजे भोसले यांना ३६२ व्या पुण्यतिथीनिमित्त आज २३ जानेवारी रोजी कर्नाटक राज्यातील होदेगेरी येथील समाधीस्थळी अभिवादन करण्यात आले. या सोहळ्याला संपूर्ण महाराष्ट्रातील शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती श्री. शहाजीराजे भोसले स्मारक समिती - कर्नाटक राज्य अध्यक्ष मल्लेशी शिंदे तसेच स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठान अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी दिली.

२३ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत समाधीस्थळी अभिवादन करण्यात आले, त्यानंतर देशभरातून उपस्थित राहणाऱ्या मान्यवरांची शहाजीराजे भोसले यांच्या कार्यकर्तृत्वावर आधारित मनोगते, तसेच आयोजकांच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी उपस्थित शिवभक्तांसाठी भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली होती.

स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची कर्मभूमी कर्नाटक राज्य असली, तरी त्यांची जन्मभूमी महाराष्ट्रातील श्रीक्षेत्र वेरूळ - संभाजीनगर ही आहे. मालोजीराजे भोसले व उमाबाईसाहेब या मराठी दाम्पत्याच्या पोटी जन्मलेले शहाजीराजे भोसले अमाप शक्ती, युद्धकौशल्य आणि राजकीय दूरदृष्टीचे धनी होते. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राच्या



इतिहासाला नवी दिशा मिळाली असून, संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या वतीनेही कर्नाटकातील होदेगेरी येथे शहाजीराजांच्या चरणी नतमस्तक झाल्यानंतर एक नवीन ऊर्जा घेऊन देशभरामध्ये शिव कार्य करणार असल्याचे राजेंद्र पवार यांनी यावेळी सांगितले. दरवर्षी प्रमाणे हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत हा पुण्यतिथी सोहळा संपन्न झाला. यंदा कर्नाटकसह महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने शिवभक्त सहभागी झाले होते. विविध राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधीही या सोहळ्यास उपस्थित होते, तसेच कर्नाटक भाषेतील शिवगीते व भजनांचे विशेष आयोजन यावेळी करण्यात आले होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# भविष्याची घडी बसविण्यासाठी

स्वित्झर्लंडमधील लॅण्ड वासर नदीच्या काठावर वसलेल्या, स्विस आल्प्स पर्वताच्या प्लेसूर आणि अल्बूला या पर्वतरागांनी वेढलेल्या आणि जेमतेम अकरा-बारा हजार लोकवस्ती असलेल्या, युरोपातील सर्वांत उंचीवर वसलेल्या दावोस या शहरात दरवर्षी भरविल्या जाणाऱ्या जागतिक आर्थिक फोरम परिषदेच्या बैठकीत जगभरातील मोठे नेते आणि उद्योगपतींना निमंत्रित केले जाते. जगभरातील जवळपास अडीच हजारांहून अधिक नेते, उद्योगपतींचा सहभाग असलेल्या या बैठकीकडे 'एलिट क्लास परिषद' म्हणून पाहिले जाते. दावोसमधील या परिषदेत सरकारी आणि खाजगी व्यक्ती, संघटना एकत्र येऊन जागतिक विकासासाठी निर्णय घेतात. जागतिक आर्थिक परिषद या १९७१ मध्ये स्थापन झालेल्या खाजगी संस्थेचे मुख्यालय जिनिव्हा या स्वित्झर्लंडच्या राजधानीमध्ये आहे. या संस्थेला आंतरराष्ट्रीय संस्था म्हणून मान्यता मिळालेली आहे. जागतिक व्यवसाय, राजकारण, शिक्षण आणि इतर क्षेत्रातील व्यक्तींना एकत्र आणून जागतिक क्षेत्रीय आणि औद्योगिक विकासाला चालना देणे हे या संस्थेचे उद्दिष्ट असल्याने या बैठकीत व्यापार, राजकारण, कला, शिक्षण आणि इतर क्षेत्रांतील मोठ्या व्यक्ती सहभाग घेतात. १९९७ मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान एच. डी देवेगौडा हे पहिल्यांदा या परिषदेत सहभागी झाले आणि पुढे तब्बल २१ वर्षांनंतर, २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परिषदेत हजेरी लावली. 'मोडकळीस आलेल्या जगाच्या भविष्यनिर्मितीसाठी भागीदारी', अशी त्या वर्षीच्या परिषदेची संकल्पना होती. भारतातील सुमारे २० उद्योगांसह, काही नामवंत कलावंतदेखील त्या परिषदेत उपस्थित राहिले आणि विशेष म्हणजे, भारतीय खाद्यसंस्कृतीचे आणि योगविद्येचे प्रात्यक्षिक हे त्या वर्षी प्रथमच त्या परिषदेचे आकर्षण ठरले.

सरत्या आठवड्यात ही वार्षिक परिषद पार पडली आणि त्यावर राजकीय चर्चादेखील सुरू झाली. दावोस परिषदेत महाराष्ट्राचा बोलबाला सुरू झाला, त्याला दोन वर्षांचा काळ उलटला आहे. यंदाच्या परिषदेत, तर महाराष्ट्राचा अक्षरशः गजर होत असल्याचेच चित्र दिसले. दावोस म्हणजे केवळ सामंजस्य करारांचे ठिकाण नाही, तर जगभरातील नव्या तंत्रज्ञानाच्या, माहितीच्या अद्ययावत प्रवाहांची दिशा महाराष्ट्राकडे वळविण्याच्या प्रामाणिक प्रयत्नांची ती एक कसोटीदेखील आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या परिषदेच्या प्रारंभीच्या काही तासांतच या महाकसोटीचे आव्हान पेलून महाराष्ट्राच्या औद्योगिक, वैज्ञानिक, तांत्रिक प्रगतीचे मार्ग विस्तृत केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायलाच हवे! महाराष्ट्र उद्योगस्नेही होत आहे, जागतिक प्रगतीच्या पावलांनी आपला मोहरा महाराष्ट्राकडे वळविण्यास सुरुवात केली आहे आणि गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र ही उद्योगविश्वाच्या विश्वासाची भूमी ठरली आहे, असा या वाटचालीचा स्पष्ट संकेत महाराष्ट्रास निश्चितच सुखावणारा आहे. यंदाच्या परिषदेत पहिल्याच दिवशी हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, माहिती-तंत्रज्ञान, विजेवरील स्वयंचलित वाहन उद्योग, जहाज बांधणी, डिजिटल इन्फ्रा आदी क्षेत्रांतील सुमारे १४ लाख ५० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा ओघ महाराष्ट्रात येणार हे स्पष्ट झाले आहे. त्याबाबत झालेले सामंजस्य करार ही या प्रक्रियेची पहिली पायरी आहे आणि महाराष्ट्रातील उद्योगस्नेही सामाजिक संस्कृतीवर उद्योगक्षेत्राने दाखविलेल्या विश्वासाचा ठळक पुरावादेखील आहे. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही', अशी ग्वाही मुख्यमंत्रिपदी विराजमान होताच देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेस दिली होती. तो महाराष्ट्राच्या सामाजिक संस्कृतीवरील विश्वास होता आणि आता जगातून महाराष्ट्राकडे वळत असलेला गुंतवणुकीचा ओघ पाहता, जागतिक उद्योगविश्वासही तसाच विश्वास वाटत असल्याचे सिद्ध झाले आहे. कोणत्याही राज्यात, देशात गुंतवणूक करण्यास जगभरातील नामांकित उद्योग पुढे येतात, तेव्हा त्या राज्यात किंवा देशात केवळ औद्योगिक प्रगती होते, या प्रगतीतून रोजगाराच्या संधी निर्माण होतात, त्यामुळे जनतेचे जीवनमान सुधारते हा फायदा तर होतोच, पण जीवनमान सुधारलेली जनता समाधानी होत असल्याने, अस्थिर मानसिकता दूर होऊन सामाजिक सामंजस्याचे वातावरण निर्माण होते, हा याचा सर्वांत मोठा फायदा असतो.

महाराष्ट्रात अगदी कालपरवापर्यंत उद्योगविश्वाला सामाजिक मानसिकतेची धास्ती वाटत होती. खंडणीखोरी, सुविधांचा अभाव, रोजगारक्षम वर्गाची विश्वासार्हता अशा अनेक मुद्द्यांमुळे उद्योग सुरू करणे तर दूरच, पण अस्तित्वात असलेले उद्योगही आश्वस्तपणे चालविण्याबाबत उद्योगविश्व साशंक असल्याचे चित्र होते. महाविकास आघाडी सरकार सत्तेवर असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तर महाराष्ट्राच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे राज्यातील वाढत्या खंडणीखोरी व राजकीय दबावामुळे निर्माण झालेल्या अविश्वासाच्या वातावरणाविषयी लेखी नाराजीदेखील व्यक्त केली होती. अशाच स्थानिक कारणांमुळे काही उद्योग बंद पडत असल्याच्या तर काहींनी गाशा गुंडाळण्याची तयारी सुरू केल्याच्या बातम्याही पसरल्याने, उद्योगविश्वात महाराष्ट्राविषयी अविश्वासाचे वातावरण पसरले होते. आता ते चित्र बदलले असून महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासाठी उद्योगक्षेत्र उत्सुक असल्याची ग्वाही देणारे नवे, आश्वस्त करणारे चित्र दिसू लागले आहे, ही राज्याच्या दृष्टीने समाधानाचीच बाब आहे. महाराष्ट्रावरील हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी महाराष्ट्र सज्ज असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस परिषदेतील सहभागी उद्योगांना दिली आहे. आवश्यक व दर्जेदार सुविधा, रोजगारक्षम मनुष्यबळ आणि सुरक्षित वातावरण या उद्योगांच्या पहिल्या गरजा असतात. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्याचीही हमी दिली आहे. यंदाच्या परिषदेतील गुंतवणुकीचा आकडा विक्रमी ठरेल आणि 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' या ग्वाहीवरील राज्याचा विश्वास दृढ होईल असेच हे चित्र आहे.

केवळ उद्योगांमधील गुंतवणुकीबरोबरच, विकासाचा विश्वासही अशा परिषदांमधून निर्माण होत असतो. तिसरी मुंबई ही एक संकल्पना गेल्या अनेक दशकांपासून मांडली जात होती. आता ही संकल्पना प्रत्यक्षात येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. याच तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीची मुहूर्तमेढ नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या निर्मितीतून रोवली गेली आहेच, त्यात भर म्हणून आता तिसऱ्या मुंबईतील पहिले शहर म्हणून मिरविण्याचा मान रायगड-पेण ग्रोथ सेंटरला मिळाला आहे. अशा ग्रोथ सेंटरची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केल्यानंतर लगेचच



नवी मुंबई विमानतळापासून दहा किलोमीटरच्या परिघात गुंतवणूक करण्यासाठी उद्योगांनी तयारी दाखविली आणि सुमारे एक लाख कोटी रुपये गुंतवणुकीचे सामंजस्य करारही पार पडले, हा प्रगतीच्या पावलांसोबत आलेला शुभशकुन आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातील अखेरच्या माणसापर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी वैद्यकीय तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे अपरिहार्य आहे. त्यामुळे, या तंत्रज्ञानावर आधारित वैद्यकीय सेवा क्षेत्रातील स्टार्टअपकरिता अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा सरकारचा संकल्पदेखील उल्लेखनीय आहे.

भांडवलापेक्षादेखील विश्वासार्हता महत्त्वाची असते, या मताचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी अनेकदा पुनरुच्चार केला आहे. दावोस परिषदेतील गुंतवणुकीतून विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब झाल्यामुळेच महाराष्ट्राकरिता ही परिषद वर्षागणिक नव्या संधी, नवे विचार आणि नव्या कल्पनांची जन्मदात्री ठरली आहे. गेल्या वर्षीच्या परिषदेत महाराष्ट्रात १६ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार करण्यात आले होते. गेल्या दशकभरात महाराष्ट्राने गुंतवणुकीबाबत केलेल्या प्रगतीतून आता विकासाचा विश्वास वास्तवात येण्यास सुरुवात झाली आहे. याआधीच्या करारांपैकी अनेक प्रकल्प अंमलबजावणीच्या दिशेने झपाट्याने वाटचालही करू लागले आहेत आणि विशेष म्हणजे, या करारांमुळे, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात विकासाची संधी आणि त्याची फळे पोहोचतील अशी चिन्हे दिसू लागली आहेत. मुंबई-पुणे-नाशिक या सुवर्ण त्रिकोणाच्या कक्षा आता विस्तारत असून त्यांनी मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्रालाही कवेत घेतले आहे. महानगरांभोवती घुटमळणारा विकास आता ग्रामीण आणि विकासापासून वर्षानुवर्षे वंचित राहिलेल्या प्रदेशांकडे वाटचाल करत आहे.

जगभरातील उद्योगविश्वात आणि प्रमुख नेत्यांच्या वर्तुळात महाराष्ट्राचा असा बोलबाला सुरू असताना, प्रत्यक्ष महाराष्ट्रात मात्र या परिषदेतील कामगिरीच्या नावाने बोटे मोडण्यासाठी काही असंतुष्टांची स्पर्धा सुरू होती. जागतिक मंच म्हटल्या जाणाऱ्या परिषदेत जायचे आणि भारतातील उद्योगांसोबत करार करून त्याचा गवगवा करायचा, असा प्रचार करत या मंडळींनी राज्यातील नव्या गुंतवणूक संधींची खिल्ली उडविण्याची संधीदेखील साधली. गेल्या सुमारे तीन दशकांपासून ही परिषद दावोसमध्ये भरविली जात आहे आणि १९९७ नंतरच्या दोन दशकांपासून भारतातील अनेक नामांकित कंपन्या, उद्योगपती सहभागी होऊन जगाच्या उद्योगक्षेत्रात भरीव कामगिरी बजावण्यात आपली क्षमता सिद्ध करत आहेत. या परिषदेत सहभागी झालेल्या भारतीय कंपन्या केवळ दावोसमध्ये जाऊन भारतात गुंतवणूक करण्याच्या हेतूने उपस्थित राहिल्या नव्हत्या. जगातील अनेक देशांत गुंतवणुकीसाठीच्या संधी शोधण्याची त्यांची क्षमता या मंचावरून दाखवत होत्या. जगभरातील गुंतवणूक संधींचा शोध घेत असताना, भारतातच आणि विशेषतः महाराष्ट्रातच गुंतवणूक करून आपल्या क्षमतांची क्षितिजे विस्तारण्याची या उद्योगांची मानसिकता म्हणजे, महाराष्ट्राच्या गुंतवणूकस्नेही वातावरणावरील विश्वासाचा पुरावा आहे. जगाच्या पाठीवर गुंतवणूक करून जे काही लाभ मिळू शकतात, तेच लाभ आणि त्याच संधी महाराष्ट्राच्या मातीतही आपल्याला मिळू शकतात, हा त्यांचा विश्वास या करारांमधून अधोरेखित झाला आहे. महाराष्ट्र ही खऱ्या अर्थाने उद्योगांच्या उभारणीसाठी योग्य ठरणारी, उद्योगस्नेही भूमी आहे, याची ही पावती मानावी लागेल. दुसरे म्हणजे, दावोसच्या या परिषदेत महाराष्ट्राने केवळ भारतातील उद्योगांसोबत करार केलेले नाहीत. जागतिक पातळीवरील अन्य अनेक उद्योगांनीही याच परिषदेत महाराष्ट्रातील गुंतवणुकीबाबत दाखविलेली उत्सुकता, महाराष्ट्राच्या दालनास भेटी देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी केलेली चर्चा पाहता, महाराष्ट्राच्या सकारात्मक वातावरणाचा विश्वास जागतिक उद्योगविश्वाला पटल्याचेही स्पष्ट झाले आहे. पायाभूत सुविधा आणि कोणत्याही उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ यांच्या उपलब्धतेची खात्री नसेल, तर कोणताही उद्योग गुंतवणूक करत नाही. महाराष्ट्राने या दोनही क्षेत्रांत भरीव कमाई केली आहे, असा याचा अर्थ आहे. जगभरातील उद्योगक्षेत्रांतील कोणत्याही उद्योगाने महाराष्ट्रात गुंतवणूक केली, तर त्यासाठी आवश्यक असलेले रोजगारक्षम मनुष्यबळ महाराष्ट्राकडे आहे, याची खात्री जगाला पटली आहे. त्यामुळे, या गुंतवणुकीतून केवळ रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेतच, पण या संधींचा लाभ घेण्याचे कौशल्य आणि क्षमता असलेली रोजगारक्षम तरुणाईदेखील महाराष्ट्रातच आहे, हेदेखील यातून अधोरेखित झाले आहे. कौशल्य विकासाच्या क्षेत्रात महाराष्ट्राने केलेल्या प्रगतीचा हा एक स्पष्ट पुरावा प्रत्यक्षपणे पाहावयास मिळतो, हे दावोस परिषदेतील जागतिक उद्योगांच्या महाराष्ट्राबाबतच्या दृष्टिकोनातून उघड झाले आहे.

थोडक्यात, जागतिक आर्थिक परिषद म्हणजे भारतीय राज्यांसाठी केवळ आंतरराष्ट्रीय व्यासपीठ नसून, 'गुंतवणूक आकर्षणाची स्पर्धा' ठरलेली आहे. गेल्या दशकात, विशेषतः २०१५ नंतर आणि ठळकपणे २०२२ नंतर, महाराष्ट्राने दावोस परिषदेत जागतिक गुंतवणूक करारांच्या बाबतीत आघाडी घेतल्याचे चित्र दिसते. २०२२ ते २०२६ या कालखंडात दावोस परिषदेत महाराष्ट्रासाठी झालेल्या सामंजस्य करारांची रक्कम अभूतपूर्व अशीच आहे. २०२२ मध्ये सुमारे ३० हजार कोटी, २०२३ मध्ये जवळपास ८८ हजार कोटी, २०२५ मध्ये थेट १५.७ लाख कोटी आणि २०२६ मध्ये पहिल्याच दिवसात १४.५ लाख कोटींच्या करारांची घोषणा झाली. एकूण आकडे पाहता, महाराष्ट्राने 'गुंतवणुकीचे इंजिन' म्हणून स्वतःची प्रतिमा अधिक मजबूत केल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. मात्र, विकासाच्या वाटचालीचा कस आकड्यांच्या पलीकडे जाऊन अंमलबजावणीच्या उंबरठ्यावर लागतो. दावोस येथे झालेले सामंजस्य करार म्हणजे कायदेशीर बंधनकारक गुंतवणूक नव्हे, तर उद्देशाची घोषणा असते. त्यातील किती करार प्रत्यक्ष प्रकल्पात अवतरतात, हा कळीचा मुद्दा वारंवार उपस्थित केला जात असतो. त्यामुळेच, राज्य सरकारचा अंमलबजावणीबाबतचा दावादेखील लक्षात घेणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांत दावोस करारांपैकी ६० ते ७० टक्के प्रकल्प प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या मार्गावर आहेत. काही अहवालांनुसार २०२५ मधील करारांपैकी सुमारे ८५ टक्के प्रकल्प प्रारंभिक टप्प्यात असल्याचे सांगितले जाते. तरीही, 'जमीन वाटप, पर्यावरण मंजुरी, पायाभूत सुविधा, स्थानिक विरोध' अशा अडथळ्यांमुळे अनेक प्रकल्प वर्षानुवर्षे कागदावरच राहिल्याचा अनुभव महाराष्ट्राला नवा नाही. गुंतवणूक घोषणांबरोबरच लाखो रोजगारनिर्मितीचे दावेदेखील केले जातात. २०२५ च्या दावोस परिषदेनंतर सुमारे १६ लाख रोजगार निर्माण होतील, असा दावा करण्यात आला. मात्र, डेटा सेंटर्स, एआय हब्स, फायनान्शियल इन्फ्रास्ट्रक्चर यासारख्या क्षेत्रांत गुंतवणूक मोठी असली तरी थेट रोजगार अत्यंत मर्यादित असतो. उदाहरणार्थ, दहा हजार कोटींचा डेटा सेंटर प्रकल्प प्रत्यक्षात काहीशेच थेट नोकऱ्या निर्माण करतो. उलट मॅन्युफॅक्चरिंग, विजेवरील वाहने, बॅटरी उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स असेम्ब्ली यासारख्या क्षेत्रांत रोजगारनिर्मिती तुलनेने जास्त असते. त्यामुळे, दावोस परिषदेनंतर जाहीर होणारे रोजगाराच्या संधींचे आकडे हे बहुतांश अनुमानाधारित असून, प्रत्यक्षात किती युवकांना कायमस्वरूपी नोकरी मिळते याचा स्वतंत्र आणि पारदर्शक हिशेबदेखील उघड होणे गरजेचे आहे. असे असले तरी, दावोसच्या निमित्ताने एक सकारात्मक बदल दिसतो. तो म्हणजे, गुंतवणुकीचा भौगोलिक विस्तार! मुंबई महानगर प्रदेश अजूनही सुमारे ४० टक्के गुंतवणूक खेचतो, हे वास्तव असले तरी त्यापलीकडच्या महाराष्ट्रातही गुंतवणूकस्नेही वातावरण निर्माण करण्यात राज्य सरकार यशस्वी ठरले आहे. विदर्भात हरित ऊर्जा, लॉजिस्टिक्स, विजेवरील वाहन निर्मिती आदी प्रकल्प मोठ्या प्रमाणात येत आहेत. मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रालाही काही प्रमाणात औद्योगिक संधी मिळत आहेत. तथापि, मराठवाड्याच्या औद्योगिक अनुशेषाची खंत अजूनही संपूर्णपणे संपलेली नाही. मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाचा वाटा अजूनही अपेक्षेपेक्षा कमी असून पाण्याची टंचाई, कौशल्याचा अभाव आणि पायाभूत सुविधांची मर्यादा हे प्रश्न कायम आहेत. त्यामुळे 'गुंतवणूक आली' इतक्यावर समाधान न मानता 'गुंतवणूक कुठे आणि कशी आली' याचा विचार करणे गरजेचे ठरते. या परिषदेतील विकासाचे एक सकारात्मक चित्र ज्याप्रमाणे उभे राहते, तसेच काही राजकीय संकेतदेखील मिळत असतात. दावोस परिषद सत्ताधाऱ्यांसाठी जागतिक व्यासपीठावर राज्याची प्रतिमा उंचावण्याचे साधन ठरते. कोटींच्या घोषणांमुळे राजकीय श्रेयवाद होतो. यंदाच्या दावोस परिषदेमुळे महाराष्ट्राला जागतिक गुंतवणूक नकाशावर निश्चितच अग्रस्थान मिळाले आहे. हरित ऊर्जा, मॅन्युफॅक्चरिंग आणि नव्या तंत्रज्ञानामुळे राज्याच्या औद्योगिक रचनेत दीर्घकालीन बदल घडण्याची शक्यता आहे. मात्र गुंतवणूक करारांचे आकडे, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि रोजगारनिर्मिती यामधील दरी कमी करणे हेच पुढील काळातील खरे आव्हान आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### रथसप्तमी आणि दान



रथसप्तमी हा सूर्याच्या उपासनेचा दिवस आहे. अदिती आणि कश्यप यांचा पुत्र सूर्य याचा हा जन्मदिवस आहे असे मानले जाते. या दिवशी भक्त सकाळी सूर्योदयापूर्वी स्नान करतात. लाल फुले, चंदन, कापूर अर्पण करून छोट्या कलशातून सूर्याला अर्घ्य देतात. अशा पूजेने समृद्धी प्राप्त होते. सात घोडे (उच्चैःश्रवा) आणि सारथी अरुण (गरुडाचा मोठा भाऊ) यासह सूर्याची पूजा करताना सूर्याची सोन्याची प्रतिमा रथात ठेवतात. तुळशी वृंदावनाच्या समोर रथ आणि सूर्य यांची रांगोळी काढतात. या दिवशी अंगणात मातीच्या एका छोट्या बोळक्यात दूध ठेवून ते उकळवून आटवतात व सूर्याला खिरीचा नैवेद्य दाखवतात. या दिवसाचे व्रत म्हणून महत्त्व असल्याने या दिवशी उपवासही केला जातो. महाराष्ट्रात मकरसंक्रातीला सुरू झालेले स्त्रियांचे तिळगुळाचे व हळदीकुंकवाचे दैनंदिन समारंभ रथसप्तमीच्या दिवशी संपन्न होतात. रथसप्तमी ही वसंत पंचमीनंतर दोन/तीन दिवसांनी येते. या दिवशी दिलेले दान विशेष लाभदायी मानले जाते. दान म्हणजे कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता गरजू व्यक्तीला मदत करणे, ज्यात अन्नदान, वस्त्रदान, विद्यादान, नेत्रदान, रक्तदान, अवयवदान, अभयदान असे अनेक प्रकार आहे.

**दानेन प्राप्यते स्वर्गो !**

दान दिल्याने स्वर्गप्राप्ती होते. जे दान न मागता दिले जाते ते सर्वांत उत्तम दान मानले जाते. माता, पिता, गुरू, मित्र, विनम्र आणि उपकारी व्यक्ती, दीन दुबळे व श्रेष्ठ व्यक्तींना दिलेले दान नेहमीच फलदायी ठरते. जे धन चांगल्या मार्गाने म्हणजे धर्माच्या मार्गाने कमावले असेल तेच दानात द्यावे. दान हे पुण्यकारक मानले जाते. दान म्हणजे फक्त वस्तू देणे नव्हे, तर हृदयातून केलेली सेवा आहे. दान देताना महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे ते नेहमी योग्य व्यक्तीला म्हणजे सत्पात्री असावे, दान नेहमी निःस्वार्थ भावनेने करावे. एका हाताने केलेले दान दुसऱ्या हाताला कळू नये. असे जरी असले तरी कधी कधी एखाद्याच्या दानाने इतरांना दान देण्याची प्रेरणा मिळते.

**ध्यानं परं कृतयुगे, त्रैतायाम ज्ञानमुच्यते**
**द्वापारे यज्ञ मेवाहुः दानमेव कलौ युगे**

म्हणजे कृतयुगात ध्यान, त्रेता युगात ज्ञान, द्वापार युगात यज्ञ आणि कलियुगात दान ही सर्वश्रेष्ठ साधने आहेत. पुरातन काळात दधिची ऋषींनी वृत्तसुराला मारण्यासाठी आपल्या अस्थींचे इंद्रदेवाला दान दिले, राजा रघु यांनी सर्व संपत्ती ब्राह्मणांना दान केली.

राजा हरिश्चंद्राने स्वप्नात दिसलेले प्रत्यक्षात उतरवून आपले संपूर्ण राज्य ऋषी विश्वामित्रांना दान केले. शिबी राजाने कबुतराचे प्राण वाचवण्याकरता आपल्या अंगावरचे मांस काढून दिले. कर्णाने जन्मतः प्राप्त कवच कुंडलांचे दान दिले. कुठलेही शुभ कार्य करण्याअगोदर काही ना काही दान करण्याची प्रथा आहे. अन्न शिजवण्याआधी घरातील गृहिणी अग्नीला दान देत असते. दानाचे सात्त्विक, राजस आणि तामस असे गुणांनुसार ३ मुख्य प्रकार आहेत जे दान देण्याच्या पद्धती आणि हेतूवर अवलंबून असतात. कोणत्याही प्रकारे केलेल्या दानाने कल्याणच होते. दानाशिवाय जीवन व्यर्थ आहे. देण्याचा आनंद हा घेण्याच्या आनंदापेक्षा जास्त असतो.

**वंदना प्रमोद देशपांडे**/९४२२४४४९७७

### रेल्वे गाड्यांमध्ये पाणी का नसतं?

डिसेंबर व जानेवारीत दोनदा रेल्वेने प्रवास करण्याचा योग आला. १७ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास नाशिकला येणाऱ्या सेवाग्रामने नागपूरला येत असताना गाडीच्या स्वच्छतागृहात पाणी नव्हते. त्यामुळे अतोनात त्रास झाला. पाणी नसल्याने घाणीचे साम्राज्य होते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

दुसरा अनुभव २३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी सव्वातीनला सुटणाऱ्या पुणे-अजनी या गाडीत आला. पुण्याहून सुटलेल्या या गाडीत नागपूर आले तरी स्वच्छतागृहात पाणी नव्हते. दोन्ही गाड्या सुपरफास्ट असून त्यांचे भाडेही काही कमी नाही. रेल्वे गाड्यांमध्ये हिवाळ्यात पाणी नसेल, तर उन्हाळ्यात काय स्थिती राहील, याचा विचारच करवत नाही. सर्वच गाड्या अखेरच्या स्थानकावर पोहोचल्यावर साफसफाईसाठी पुरेसा वेळ मिळत असूनही कामचुकार रेल्वे कर्मचारी आपली जबाबदारी पार पाडत नसावे, असे दोन गाड्यांतील अनुभवावरून वाटते.

**विनय म. करंदीकर**/९४०३२०८७५९

### राजकीय सूडबुद्धी आणि नियतीचा न्याय

महाराष्ट्राच्या राजकारणात 'जसे कराल तसे भराल' या म्हणीचा प्रत्यय देणाऱ्या अनेक घटना गेल्या काही वर्षांत घडल्या. विशेषतः प्रसिद्ध अभिनेत्री कंगना राणावत आणि उबाठा नेते उद्धव ठाकरे यांच्यातील संघर्ष हे याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात कंगना राणावत यांनी पालघरमधील साधू हत्याकांड, रिपब्लिक टीव्हीचे संपादक अर्णव गोस्वामी यांची अटक, निवृत्त नौदल अधिकाऱ्याला झालेली मारहाण याविषयी सोशल मीडियावरून टीका केली होती. या काळात त्यांनी सातत्याने तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले होते. यामुळे उद्धव ठाकरे सरकार आणि कंगना राणावत यांच्यात संघर्षाची ठिणगी पडली होती. या टीकेचा सूड म्हणा की अजून काही मुंबई महानगरपालिकेने अभिनेत्री कंगना राणावत यांच्या पाली हिल येथील त्यांच्या कार्यालयातील कथित अनधिकृत बांधकामावर कारवाई करत ते पाडले. त्यावेळी आपली प्रतिक्रिया देताना कंगना यांनी एक विधान केले होते ''आज माझं घर तुटलं आहे, उद्या तुझा अहंकार तुटेल. हे काळाचं चक्र आहे, लक्षात ठेवा!''

असे म्हणतात शब्द लागतात. या घटनेनंतर काही काळातच महाविकास आघाडी सरकार कोसळले. शिवसेनेत मोठे बंड झाले आणि उद्धव ठाकरे यांना सत्तेच्या मुख्य पदावरून पायउतार व्हावे लागले. केवळ सत्ताच गेली नाही, तर पक्षाचे नाव, धनुष्यबाण हे चिन्ह आणि बहुसंख्य आमदार-खासदार देखील त्यांच्यापासून दुरावले. त्यानंतर पार पडलेल्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत उबाठाचा मोठा फज्जा उडाला. विरोधी पक्षनेतेपदासाठी आवश्यक असणारे संख्याबळही त्यांना मिळवता आले नाही. परत सत्ता गेली. आता नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकीतही हा पक्ष चौथ्या-पाचव्या क्रमांकावर फेकला गेला. यापेक्षा सर्वांत मोठा धक्का बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत बसला. ही महापालिका ठाकरे कुटुंबासाठी प्रतिष्ठेची होती, कारण याच पालिकेच्या जोरावर शिवसेना राज्यभर पसरली होती. तब्बल ३० वर्षे एकहाती सत्ता असलेल्या या देशातील सर्वांत श्रीमंत महापालिकेतून उबाठा हद्दपार झाली तीही हिंदुहृदयसम्राट, मराठी माणसाच्या अभिमानाचे प्रतीक, बाळासाहेब ठाकरे यांच्या शंभराव्या जयंती वर्षात, यापेक्षा दुर्दैव कोणते असावे. त्यावेळी अभिनेत्री कंगना राणावत यांनी वर्तवलेली अहंकार तुटण्याची भविष्यवाणी आजच्या राजकीय स्थितीवरून खरी ठरताना दिसत आहे. आज कंगना खासदार म्हणून लोकसभेत आहेत, तर दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागत आहे. जसे कराल तसे भराल या उक्तीप्रमाणेच या राजकीय नाट्याचा शेवट झाला आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### प्रजासत्ताक दिन : अधिकारापासून कर्तव्यापर्यंत...

२६ जानेवारी हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि गौरवशाली दिवस आहे. हा दिवस आपण प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. मात्र या दिवसाचे महत्त्व केवळ ध्वजवंदन, संचलन किंवा औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित नाही. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने स्वतःचे संविधान लागू झाले आणि भारत एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून जगाच्या पाठीवर उभा राहिला. त्यामुळे हा दिवस भारतीय लोकशाहीचा, स्वातंत्र्याचा आणि जबाबदारीचा उत्सव आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले. परंतु हे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी आणि समाजव्यवस्था योग्य दिशेने नेण्यासाठी संविधानाची आवश्यकता होती. विविध जाती, धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरा असलेल्या भारतासारख्या विशाल देशासाठी एक सुसंगत, समताधिष्ठित आणि न्यायपूर्ण राज्यघटना तयार करणे हे अत्यंत आव्हानात्मक कार्य होते. हे ऐतिहासिक कार्य भारतीय संविधान सभेने केले. भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास केला आणि भारतीय समाजाच्या वास्तव परिस्थितीचा विचार करून संविधानाची रचना केली. त्यांच्या दृष्टीने संविधान म्हणजे केवळ कायद्यांचा संग्रह नव्हता, तर तो समाजातील शेवटच्या घटकाच्या उन्नतीचा मार्ग होता. शोषित, वंचित, दलित, स्त्रिया आणि अल्पसंख्यक यांना सन्मानाचे जीवन मिळावे, यासाठी त्यांनी संविधानात सामाजिक न्यायाची ठोस मांडणी केली. भारतीय संविधानामुळे नागरिकांना मूलभूत अधिकार प्राप्त झाले. समानतेचा अधिकाराने जात, धर्म, लिंग यावर आधारित भेदभाव नाकारला. स्वातंत्र्याच्या अधिकाराने अभिव्यक्ती, विचार, संघटन आणि व्यवसाय स्वातंत्र्य दिले. धार्मिक स्वातंत्र्याने प्रत्येकाला आपला धर्म पाळण्याचा अधिकार दिला. शोषणाविरुद्धच्या अधिकाराने मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण केले. हे अधिकार भारतीय नागरिकाला केवळ स्वतंत्र नाही तर सशक्त बनवतात. आपण सर्व भारतीय आहोत ही भावना प्रत्येकाच्या मनामध्ये दृढपणे रुजणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे. भारतीय संविधानाने जात, पंथ, धर्म, लिंग यावर आधारित कोणताही भेदभाव मान्य केलेला नाही. समानतेचा अधिकार कागदावर मर्यादित न राहता तो आपल्या वागण्यात उतरला पाहिजे.

संविधानाने अधिकारांसोबत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली. देशाची एकता व अखंडता जपणे, संविधानाचा सन्मान करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, सामाजिक सलोखा राखणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. मनाला येईल तसे वागणे, नियम मोडणे, सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करणे हे स्वातंत्र्याचे लक्षण नाही. आज अनेकदा स्वातंत्र्याचा गैरअर्थ लावला जातो. शासकीय मालमत्तेची तोडफोड, रस्ते, बस, शाळा, रुग्णालये यांचे नुकसान केले जाते. ही संपत्ती कोणाची आहे याचा विचार न करता बेपर्वाईने वागले जाते. प्रत्यक्षात ही संपत्ती शासनाची नसून ती प्रत्येक नागरिकाची आहे. माझी गोष्ट आहे म्हणून तिची काळजी घेणे आवश्यक असते, तसेच सार्वजनिक साधनसंपत्तीची काळजी घेणे हेही आपले कर्तव्य आहे.

जागतिक पातळीवर भारताची ओळख वाढत असताना प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची ठरते. भारत महासत्ता बनणार असेल तर ते केवळ भाषणातून किंवा आकड्यांतून नाही तर प्रत्यक्ष कृतीतून होईल. शिक्षण घेऊन दुसऱ्या देशात सेवा करण्यापेक्षा आपल्या देशातच प्रामाणिकपणे काम करून राष्ट्रउभारणीत योगदान देणे हे खरे देशप्रेम आहे. ''भारत माझा देश आहे'' असे म्हणताना हे शब्द केवळ उच्चारापुरता मर्यादित न राहता तो आपल्या वृत्तीत उतरला पाहिजे. प्रजासत्ताक दिन आपल्याला संविधानाची अस्मिता जपण्याची आठवण करून देतो. संविधान हा केवळ ग्रंथ नसून तो आपल्या आचरणातून जिवंत राहणारा दस्तावेज आहे.

**डॉ. राजेंद्र टेकाडे**/९१४५७७९०५०

### 'हिंद दी चादर' मानवी कल्याणाचा राष्ट्राभिमानी वारसा

श्री गुरू तेगबहादूर यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दीनिमित्त नांदेड येथे राज्य सरकार द्वारा 'हिंद दी चादर' हा ऐतिहासिक शहिदी समागम होत आहे. 'हिंद दी चादर' अर्थात अखंड भारताची ढाल, भारताचे संरक्षक ही उपाधी केवळ धार्मिक नसून ती एक प्रखर राष्ट्राभिमानी परंपरा आहे. शीख धर्माचे नववे गुरू, श्री गुरू तेगबहादूर साहिब यांच्या सर्वोच्च बलिदानाचे प्रतीक आहे. गुरू तेगबहादूर यांचे बलिदान हे प्रत्येक भारतीयांसाठी होते. सतराशे शतकातील मुघल राजवटीत जेव्हा सक्तीने धर्मांतरे होत होती, तेव्हा त्यांनी संपूर्ण राष्ट्राच्या धार्मिक आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या सार्वभौमत्वासाठी आवाज उचलला. केवळ धर्माचा प्रश्न नव्हता, तर भारतीयांच्या मूलभूत मानवी हक्कांचा प्रश्न होता. सार्वभौमत्वाचे आणि मानवी हक्कांच्या रक्षणार्थ हे बलिदान होते. त्यांनी मुघल सत्तेसमोर देशाची अभेद्य ढाल म्हणून उभे राहून, अन्यायाला विरोध करण्याची शिकवण दिली. श्री गुरू तेगबहादूर काश्मिरी पंडितांच्या बाजूने उभे राहून, राष्ट्र प्रथम ही भावना त्यांनी अधोरेखित केली. त्यांनी सिद्ध केले की, राष्ट्राचे खरे सामर्थ्य विविधतेत आहे. त्यांच्या बलिदानाने राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजली. १६७५ रोजी दिल्लीतील चांदनी चौकात त्यांनी दिलेले बलिदान हे राष्ट्राप्रति असलेल्या त्यांच्या असीम राष्ट्रभक्तीचे आणि बलिदानाचे सर्वोच्च उदाहरण आहे. श्री गुरू तेगबहादूर यांनी आपले शीर दिले, पण राष्ट्राची मान झुकू दिली नाही हे विशेष. श्री गुरू तेगबहादूर साहिब यांचा हा राष्ट्राभिमानी वारसा आजही प्रत्येक भारतीयाला मानवतावाद, धर्मनिरपेक्षता, साहस आणि राष्ट्राच्या प्रतिष्ठेसाठी कोणत्याही प्रकारच्या त्यागाची तयारी ठेवण्याची प्रेरणा देतो.

हिंद दी चादर हा शहिदी समागमाच्या निमित्ताने शीख, बंजारा, मोहियाल, लबाना, सिकलीगर, सिंधी या गुरुबंधूचा अनुपमेय ऋणानुबंध दर्शवतो. शीख इतिहासातील हे गुरुबंधू भारतीय विविधतेला समृद्ध करणारे आहेत.



'गुरू लाधो रे'चा जयघोष करणारे बाबा मखनशाह लबाना होत. मातृभूमीच्या रक्षणासाठी, मातृभूमीच्या सन्मानासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे शिवाय मुघल सत्तेविरुद्ध बंड पुकारून अत्यंत साहसाने गुरूचा अंत्यसंस्कार करणारे युगपुरुष बाबा लखीशाह बंजारा होत. बाबा मखनशाह यांनी नवव्या गुरूचा शोध लावला तर बाबा लखीशाह बंजारा यांनी नवव्या गुरूचा सन्मानपूर्वक आपल्या महालास पेटवून अंत्यसंस्कार केला. ही ऐतिहासिक घटना युगानुयुगे मानवी कल्याणासाठी प्रचीती देत राहील.

शीख धर्माच्या आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक अत्यंत तेजस्वी आणि प्रेरणादायी अध्याय म्हणजे राष्ट्रवीर बाबा लखीशाह बंजारा आणि बाबा मखनशाह लबाना यांचा उल्लेख केला जातो. या दोन्ही महापुरुषांनी आपल्या राष्ट्राप्रति आणि गुरूंप्रति असलेली निष्ठा, त्याग आणि शौर्य यांच्या बळावर अविस्मरणीय कार्याची स्वर्णिम प्रेरणा जगापुढे उभारली. देश, धर्मासाठी सर्वस्व अर्पण करणारे त्यागाचे जाज्वल्य मूर्ती म्हणजे बाबा लखीशाह बंजारा होय. ऐतिहासिक घटना म्हणजे आठवे गुरू, श्री गुरू हरिकृष्ण साहिब यांच्या निधनानंतर पुढचे गुरू कोण, हे स्पष्ट होत नव्हते. त्या दरम्यान बाबा मखनशाह लबाना यांनी नववे गुरू तेगबहादूर यांना बकाला गावात शोधून काढताच अतिशय हर्षोल्हासाने जयघोष केला ; ''गुरू लाधो रे, गुरू लाधो रे'' (गुरू सापडले). त्यांनी केवळ गुरूंचा शोधच लावला नाही, तर नंतरच्या काळात गुरू तेगबहादूर साहिब यांच्या समर्थनार्थ अनेक लढायांमध्ये आणि कार्यात सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी आपली संपत्ती आणि सैन्य गुरूंच्या सेवेसाठी समर्पित केले. हिंद दी चादर या शहिदी समागममुळे भारतीय विविधतेला समृद्ध करणारी गुरू परंपरा राष्ट्र निर्माणाच्या दृष्टीने अधिक दृढ होईल असा विश्वास वाटतो. मानवतेसाठी श्री गुरू तेगबहादूर साहिब यांचे सर्वोच्च बलिदान आणि गुरुनिष्ठा व मातृभूमीच्या रक्षणार्थ बंजाराने दिलेले योगदान सदैव प्रेरणा देत राहील.

**एकनाथ पवार**/९८५०१३१३६८

### राष्ट्रध्वजाचा मान राखूया!

२६ जानेवारी- प्रजासत्ताक दिन हा आपला राष्ट्रीय सण आहे. यानिमित्ताने राष्ट्रध्वजाचा मान राखण्याचा संस्कार आपल्यावर करूया. राष्ट्रध्वज देशाच्या सन्मानाचे प्रतीक आहे. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला जिथे शक्य असेल तिथे तिरंगा फडकवत आपण आपले राष्ट्राप्रतिचे प्रेम आणि आदर व्यक्त करत असतो. परंतु दुर्दैवाने हे प्रेम आणि आदर अल्पकाळासाठीच टिकून राहते. १५ ऑगस्टला किंवा २६ जानेवारीला संध्याकाळी आपले राष्ट्रध्वज केराच्या टोपलीत, रस्त्यांवर, गटारात, सांडपाण्याच्या पाईपमध्ये पडलेले दिसतात. काही वेळा ध्वज तुडवलेसुद्धा जातात. अनेक वेळा कचऱ्यासोबत राष्ट्रध्वज जाळलेही जातात. हा तिरंग्याचा अपमान आहे हे आपण लक्षात घ्यायला हवे.

यावर्षी आपण निश्चय करूया की, मुलांना राष्ट्रध्वज खेळायला देणार नाही, प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज खरेदी करणार नाही, स्वतःच्या कपड्यांवर पिना लावून राष्ट्रध्वज वापरणार नाही, राष्ट्रध्वजाचा वापर बॅनर किंवा सजावट म्हणून करणार नाही, राष्ट्रध्वज जमिनीवर पडू देणार नाही. राष्ट्रध्वजाची विटंबना करणे हा गुन्हा आहे. तेव्हा आपण सर्वांनी राष्ट्रध्वजाचा सन्मान करूया.

**छाया मिराशी**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# परभणी महानगरपालिकेप्रमाणे जिल्हा परिषद निवडणूकीतसुध्दा निवडणूक विभागाचा ढिम्म कारभार

## निष्ठावानांच्या हाती भोपळा, अनेक पक्ष केले मॅनेज, पत्नीलाही आणले मनपात निवडूण

**परभणी,/प्रतिनिधी:** महानगरपालिके प्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीतसुध्दा निवडणूक विभागाच्या ढिम्म कारभारामुळे प्रमुख राजकीय पक्षांसह प्रसार माध्यमेसुध्दा हैराण झाली आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गेल्या दोन अडीच महिन्यांपासून निवडणूका सुरु आहेत. परंतु, या निवडणूकीत निवडणूक विभागांतर्गत वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा प्रकर्षाने निदर्शनास येत आहे. विशेषतः नगरपालिका व महानगरपालिका निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रियेत निवडणूक विभागाने उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेपासून ते मतमोजणीच्या टप्प्यापर्यंत सातत्याने उदासिनतेसह हलगर्जीपणा दाखवून दिला. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतरसुध्दा दोन-दोन दिवस निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांना त्या त्या प्रभागांमधून किती अर्ज दाखल झाले. याची अधिकृत माहितीसुध्दा संकलित करीत माध्यमांना पुरविता आली नाहीत. पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या याद्यासुध्दा दोन-दोन दिवस मिळाल्या नाहीत. उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतीम मुदतीनंतर लढतीचं चित्र स्पष्ट झाल्यानंतरसुध्दा तब्बल दोन दिवस रिंगणातील उमेदवारांची यादी मिळाली नाही.




मतमोजणीच्या टप्प्यातसुध्दा माध्यमांच्या प्रतिनिधींना या निवडणूक विभागाने मतमोजणीपासून कोसोदूर ठेवले. प्रतिनिधींवर अनेक बंधने लादली. निवडणूक विभाग ध्वनीक्षेपकाद्वारे जेव्हा मतमोजणीचा निकाल जाहीर करत तेव्हाच माध्यमांच्या प्रतिनिधींना माहिती मिळू लागली होती. तत्पूर्वी ताजे अपडेट द्यावयास निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणतीही तत्परता दाखविली नाही. महापालिका निवडणूकीत हे चित्र प्रकर्षाने दिसून आले. संपूर्ण राज्यातील महापालिकेंतर्गत निकाल जाहीर झाल्यानंतरसुध्दा परभणी महानगरपालिकेंतर्गत मतमोजणीचा निकाल रात्री उशीरा ११ वाजता प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींच्या हाती आला.

जिल्हा परिषद निवडणूकीतसुध्दा ये रे माझ्या मागल्या प्रमाणे तीच गत सुरु आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची बुधवारी दुपारी ३ वाजता मुदत संपल्यानंतरसुध्दा गुरुवारी रात्री ९ वाजेपर्यंत माध्यमांच्या प्रतिनिधींना दाखल केलेल्या उमेदवारांची यादी देण्यात आली नाही. या विभागाकडे वारंवार चौकशी केल्यानंतरसुध्दा स्पष्ट अशी माहिती दिली जात नाही.

एकंदरीत निवडणूक विभागांतर्गत अधिकाऱ्यातील बेजबाबदारपणा, उदासिनपणा तसेच निष्काळजीपणा प्रामुख्याने राजकीय पक्षांसह प्रसारमाध्यमे अनुभवू लागले आहेत. परंतु, साखरझोपेचे सोंग घेऊन बसलेल्या निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांना त्याचे काडीचेही सोयरसुतक नाही, हे वास्तववादी चित्र आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### मतदार दिना निमित्त मानवत शहरात जनजागर रॅली



**मानवत,/प्रतिनिधी-** परभणी येथील मेरा युवा भारत व येथील नगर परिषद कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी दिनांक २५ जानेवारी मतदार दिवस साजरा करून शहरात जणजागर पदयात्रा काढण्यात आली. हि पदयात्रा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक ते मानवत नगर पालिका कार्यालया पर्यंत काढण्यात आली. यावेळी मतदार जनजागर रॅली मध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या विदयार्थीनी पदयात्रेत सामील झाल्या. मानवत तहसिलचे तहसिलदार मा.श्री. पांडुरंग माचेवाड व मानवत नगर परिषदच्या मुख्याधिकारी श्रीमती कोमलताई सावरे यांनी हिरवा झेंडा दाखवला. कार्यक्रमाचा समारोपात मानवत नगर परिषद मध्ये नवीन नोंदणी केलेले मतदारांचे यावेळी स्वागत करण्यात आले तसेच मतदार दिनाची प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व मान्यवराचे आभार प्रदर्शन जिल्हा युवा अधिकारी शशांक रावुला यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती स्नेहाताई वाघमारे, मैथिलीताई जोशी, सुनिताताई वाकळे, स्वप्ना माथवाले, सुनीताताई नाईक, संगीताताई राऊत, सय्यद वसीम , एस. आय. गवारे यांनी परिश्रम घेऊन प्रयत्न केले.

### योगेश देशमुख भोगावकर यांची निवड

**जिंतूर-** तालुक्यातील भोगाव देवी येथील योगेश देशमुख भोगावकर यांची अजितदादा राष्ट्रवादी गटाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाच्या जिंतूर तालुका अध्यक्षपदी निवड चे पत्र जिंतूर सेलू माजी आमदार विजयराव भांबळे यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिंतूर तालुका अध्यक्ष लक्ष्मण दादा बुधवंत शिव उपस्थित होते योगेश देशमुख यांचे निवड झाल्याबद्दल त्यांच्या मूळ गावी भोगाव येथे फटाके यांच्यातील त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले या यावेळी योगेश देशमुख म्हणाले की जिंतूर सेलू विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार विजयराव भांबळे व पक्षाचे अध्यक्ष अजित दादा पवार यांनी माझ्यावर जिम्मेदारी टाकली ती यशस्वीरित्या वार करणार अशी ती म्हणाली व जिल्हा परिषद समिती त जिंतूर तालुक्यातील दहा सर्कल मधील जास्तीत जास्त उमेदवार निवडूनआणण्याचा प्रयत्न करणार असे ते म्हणाले.



### श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयात क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन संपन्न



**जिंतूर :-** येथील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयात क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य खंडेराव भिसे, उद्घाटक श्री. रमेशराव भराड तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अनुप सोळंके, प्राचार्य कैलास मुटकुळे व पत्रकार सचिन रायपत्रीवार यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम श्री सोळंके यांनी खेळा प्रती स्नेहभाव निर्माण व्हावा यासाठी उपस्थित विद्यार्थ्यांना शपथ दिली. त्यानंतर उद्घाटक श्री. भराड यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. आपल्या छोटेखानी भाषणात ते म्हणाले की, तुम्हाला येत असलेला कोणताही एखादा खेळ कधी यश शिखरावर नेऊन पोहोचवेल, हे सांगता येत नाही. खेळामुळे बऱ्याच लोकांच्या जीवनामध्ये बदल झालेला आपणास पहावयास मिळतो, तसेच शरीर स्वास्थ्यासाठीही खेळ महत्वपूर्ण आहे. म्हणून आपण खेळाला महत्त्व दिले पाहिजे असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य भिसे यांनी खेळाच्या विविध प्रकारांवर थोडक्यात प्रकाश टाकला आणि स्पर्धेतील खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कृष्णा गजभारे तर आभार प्रदर्शन प्रा. जगदीश सोमानी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. मते, प्रा. तळेकर, प्रा.वर्णेकर ,प्रा. कापरे, प्रा. बोराळकर, प्रा. भिसे,प्रा. सोळंके ,प्रा. गणपुरकर, प्रा. लोणे मॅडम, प्रा. माकोडे, प्रा. घुगे, प्रा. पंढरपूरे, प्रा. सोमानी ,प्रा. वाघमारे मॅडम, प्रा काझी, प्रा. वाघ, प्रा आदाबे, श्री. तळेकर, श्री. दहिफळे, श्री पोटेकर, श्री. चव्हाण ,श्री. वट्टमवार, श्री. भवाळे, श्री. जाधव, श्री. देवकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## प्रभूकृपा विद्यालयात स्वयंशासन दिन साजरा(स्कूल-डे)

**जिंतूर,/प्रतिनिधी-** वाघी बोबडे येथील प्रभूकृपा माध्यमिक विद्यालयात आज २३ जानेवारी २०२६शुक्रवार रोजी स्वयंशासन दिन(स्कूल डे) संपन्न झाला.

या दिवशी विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शालेय प्रशासन कसे हाताळावे याचे स्व:अनुभवातून ज्ञान घेतले. अनेक विद्यार्थ्यांनी खेळीमेळीच्या वातावरणात विविध विषय शिकवण्याचा प्रयत्न केला. मुख्याध्यापक ते शिपाई या सर्वांच्या भूमिका चोखपने पार पाडण्याचा प्रयत्न केला. परिपाठापासून सुरुवात करत राष्ट्रगीत गायनाने समारोप केला.



यामध्ये मुख्याध्यापकाची भूमिका युवराज आव्हाड, उपमुख्याध्यापक गणेश तिथे, लिपिक विठ्ठल गलांडे, शिपाई गणेश बोबडे , दत्ता राऊत यांच्यासह सर्वच विद्यार्थ्यांनी आपापल्या तासीकांमध्ये दैनंदिन शैक्षणिक कार्य पार पडले. या स्वयंशासन दिनाचे नियोजन वर्गशिक्षक श्री गजानन पाटील सर यांनी केले. शालेय प्रशासन एका दिवसासाठी कसे चालते तेव्हा कुठल्या विद्यार्थ्यांनी आपली भूमिका चांगली निभावली याचे मुख्याध्यापक संतोष साखरे सर व सर्व वर्गशिक्षक मंडळींनी निरीक्षण केले...

## जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत अबोली देशमुख प्रथम

**जिंतूर,/प्रतिनिधी-** नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्त भारतीय बालविद्या मंदिर प्रशाला परभणी येथे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जिजामाता विद्यालय जिंतुर येथील अबोली अभिजीत देशमुख हिने प्रथम क्रमांक पटकावला.

कै. नरेश कुचेरिया, कै. कैलासजी अबोटी व कै. डॉ. प्रवीणचंद्र वर्मा स्मृती जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन भारतीय बाल विद्या मंदिर प्रशाला, ममता नगर, परभणी येथे ता.२३ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत जिजामाता विद्यालय जिंतूर येथील अबोली अभिजीत देशमुख हिने माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक मिळवला. यावेळी उपशिक्षणाधिकारी गोविंद मोरे यांच्या हस्ते तिला २१०१ रुपये सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. तिच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक मनोहर कदम, संस्थेचे अध्यक्ष ब्रिजगोपाल तोष्णीवाल, सचिव रमन तोष्णीवाल, संचालिका पद्मा तोष्णीवाल यांनी अभिनंदन केले आहे.



## प्रशिक्षणास गैरहजर, ५३ कर्मचारी यांना नोटीस

**पालम,/प्रतिनिधी:** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ पालम च्या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकारी मा. विद्या मुंढे-केंद्रे मॅडम व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मा. कैलास चंद्र वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान अधिकारी यांचे पहिले प्रशिक्षण यशस्वीरीत्या संपन्न झाले. सदरील प्रशिक्षणास ५३ गैरहजर कर्मचारी यांना नोटीस बजविण्यात येऊन पुढील प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
सदर प्रशिक्षणामध्ये मतदान प्रक्रियेतील विविध टप्पे, मतदान केंद्राची रचना, मतदार यादी हाताळणी, मतदान साहित्य वितरण व संकलन, ईव्हीएम वापर, मतदानादरम्यान पाळावयाच्या सूचना, आचारसंहिता तसेच आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.१६ व्या चे मतदान दिनाच्या अनुषंगाने मतदारांसाठी प्रतिज्ञा सर्व अधिकारी व कर्मचारी यांना घेण्यात आली. उपस्थित कर्मचारी यांची आरोग्य विभागामार्फत आरोग्य तपासणी करण्यात आली. प्रत्यक्ष कामकाजात काटेकोरपणे अंमलात आणाव्यात, असे निर्देश देण्यात आले.



## बनवस सर्कल जि.प.मतदारसंघातून शांतीस्वरूप जाधव यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

**पालम,/प्रतिनिधी-** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या रणधुमाळीत राजकीय हालचालींना वेग आला असून पालम तालुक्यातील बनवस सर्कल जिल्हा परिषद मतदारसंघातून शांतीस्वरूप जाधव यांनी उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केला.या वेळी त्यांच्या समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित
या वेळी कार्यक्रत्यानी शक्तिप्रदर्शन करून ढोल-ताशांच्या गजरात,घोषणा देत कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला होता. यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी बोलताना शांतीस्वरूप जाधव यांनी सांगितले की, बनवस सर्कलमधील रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण व मूलभूत सुविधांचा सर्वांगीण विकास हेच आपले प्रमुख उद्दिष्ट आहे. जनतेच्या विश्वासावर व विकासाच्या मुद्यावर ही निवडणूक लढवणार असल्याचा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. तसेच प्रचार दौऱ्याच्या झंझावतीमध्ये मतदाराचा कोर चांगल्या प्रकारचा आढळून



आला असे हे त्यांनी बोलताना सांगितले यामध्ये आपण मतदाराचे रूम चांगल्या प्रकारे फेडणार असेही त्यांनी सांगितले मतदार राजा हे माझे दैवत असून त्यांचा कुठल्याही संकटामध्ये आणि वेळप्रसंगी मी सहकार्य करण्याची भावना त्यांनी व्यक्त केली मतदार संघामध्ये मतदारांशी चर्चा केली असता त्यांनी आमचे अमूल्य मत शांतीस्वरूप यांच्याकडेच कोण देत आहोत असेही सांगितले.

## पालकमंत्री मेघना बोर्डीकरांच्या उपस्थितीत असंख्य महिला व पुरुषानी घेतला प्रवेश

# अखेर आशाताई खिल्लारे भाजपत; भाजपात इन्कमिंग सुरूच

**जिंतूर,/प्रतिनिधी:** माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर तथा पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपमध्ये सध्या अन्य पक्षांच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा प्रवेश होत असून यापूर्वीच मजबूत असलेली जिंतूर सेलू मधील भाजप पुन्हा ऐन निवडणुकीच्या काळात भाजप मजबूत स्थितीत दिसत आहे.

नुकतीच नगरपालिका निवडणूक संपन्न झाली असून या निवडणुकीत भाजपने जिंतूर सेलूत पालिका निवडणुकीत आपली पकड मजबूत असल्याचे स्पष्ट केले असून आता सध्या मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे.

या निवडणुकी दरम्यान भाजपात प्रवेशाची जोरदार रणधुमाळी दिसून येत आहे.प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या माजी आमदार विजय भांबळे यांचे असंख्य कट्टर समर्थकांनी भाजपात प्रवेश घेतल्याने विरोधकांनी चांगला धक्का घेतल्याचे दिसून आले यापूर्वी नाना राऊत, राजेंद्र नागरे, अविनाश काळे या सारख्या मातब्बरांनी भाजपमध्ये प्रवेश घेतलेलाच आहे.

आता या पूर्वी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका अध्यक्षा मनिषा केंद्रे यांनी भाजपत प्रवेश घेऊन राष्ट्रवादी पक्षास धक्का दिला.कारण केंद्रे यांनी बहुतांश काळ राष्ट्रवादीत पक्ष वाढी साठी मोलाचे कार्य करण्यास



नेहमी पुढाकार घेत आपला ठसा त्यांनी उमटविला होता.

हा प्रवेश होत नाही तोच आज रमाई विचार महिला मंचच्या अध्यक्षा व शिव प्रतिष्ठानच्या प्रमुख आशाताई संभाजी खिल्लारे यांनीही असख्य महिला व पुरुषांना सोबत घेत पालकमंत्री मेघना बोर्डीकरांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश घेतला.

मनिषा ताई केंद्रे तसेच आशाताई खिल्लारे यांच्या भाजप प्रवेशाने भविष्यात भाजपात जिंतूर- सेलु तालुक्यात असख्य मोठ्या प्रमाणात महिलांची मजबुत मोठ भाजपाशी बांधली जाणार आहे. कारण मनिषा केंद्रे तसेच आशाताई संभाजी खिल्लारे यांची ओळख सामाजिक कार्यात नेहमी पुढाकार घेत असलेले नेतृत्व म्हणून परिचित आहेत.

आज घेतलेल्या आशाताई संभाजी खिल्लारे यांनी घेतलेल्या प्रवेशा दरम्यान दाभा,दिग्रस, गडगव्हाण, इटोली आदी गावांच्या असख्य महिला सह मोठ्या संख्येने पुरुषांचाही समावेश होता.

या प्रवेशा दरम्यान पालकमंत्री मेघना बोर्डीकरांच्या प्रमुख उपस्थिती सह डॉ. कऱ्हाळे मनिषा केंद्रे,आशाताई खिल्लारे,नानासाहेब राऊत,अविनाश काळे,आदींची उपस्थिती होती.

प्रवेशा दरम्यान आशाताई खिल्लारे यांनी तालुक्यातील मागासवर्गीयांचे असख्य प्रश्नांची सोडवणूक पालकमंत्री मेघना बोर्डीकरानी सोडवून समाजास न्याय देण्याचे आलं करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. व याच कारणाने भाजपात प्रवेश घेतल्याचा खुलासा त्यांनी केला.

भाजप पक्ष नेहमीच ''सबका साथ सबका विकास'' या तत्वावरच आपली राजकीय वाटचालीवर करत देशात नंबर एकचा पक्ष म्हणून जगता पुढे आलेला आहे.भाजप नेहमीच विकासाची व विकास कामाची गंगा सामाजिक घटकांच्या शेवटच्या स्तरापर्यंत हक्क देते असे सांगून तालुक्यातील नक्कीच पूर्ण मागासवर्गीयांचे पूर्ण प्रश्न सोडविले जातील असे प्रवेशा दरम्यान आश्वासित केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तालखेड फाट्यावर दिवसा-ढवळ्या सराफा व्यापाऱ्याला शस्त्राचा धाक दाखवत ६० लाखांचे दागिने लुटले

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२५ जानेवारी**

शहरातील अनेक सराफा व्यापारी गावोगावी जाऊन सोन्या-चांदीचे दागिने विकण्याचे काम करतात. अशाच एका सराफा व्यापाऱ्याकडून दि.२५ जानेवारी रविवार रोजी सकाळी ९:३० वाजता भर दिवसा शस्त्राचा धाक दाखवत ६० लाख रुपयांचे दागिने लुटल्याची घटना दि २५ जानेवारी रविवार रोजी घडली. घटनेने शहरातील सराफा व्यापाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याप्रकरणी मिळालेली माहिती अशी की, माजलगाव शहरातील हनुमान चौक येथे अमोल पंढरीनाथ गायके यांचे अमोल ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. ते नेहमी आपल्या मोटरसायकल वरुन विविध गावांमध्ये जाऊन सोन्या-चांदीच्या दागिन्यांची विक्री करत असतात.दि २५ जानेवारी रविवार रोजी सकाळी ९:०० वाजता ते घरातून निघाल्यानंतर, साडेनऊच्या सुमारास तालखेड फाटा परिसरात पोहोचले.तेथून पुढे खेर्डा गावाकडे जात असताना,त्यांच्या पाठीमागून एका चारचाकी वाहनातून अज्ञात चोरट्यांनी पाठलाग सुरू केला.रस्त्यावर कोणीही नसल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी व्यापाऱ्याच्या मोटरसायकल समोर चारचाकी वाहन आडवे लावले चोरट्यांनी दागिन्यांची बॅग देण्याची मागणी केली. व्यापाऱ्याने नकार दिल्यानंतर, चोरट्यांनी कोयता, गज यांसारखी शस्त्रे दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली.यानंतर व्यापाऱ्याच्या हातातील दागिन्यांची बॅग हिसकावून अज्ञात चोरट्यांनी घटनास्थळावरून चार चाकी वाहनांने पसार झाले.

३५० सोन्याचे दागिने,३ किलो चांदीचे दागिने चोरट्यांनी लुटले

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार,सराफ आमोल गायके यांच्याकडून ३५० ग्रॅम सोन्याचे विविध दागिने (अंदाजे किंमत ५० लाख) आणि ३ किलो चांदीचे विविध दागिने (अंदाजे किंमत १० लाख),असा एकूण सुमारे ६० लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची घटनास्थळी भेट

घटनेची माहिती काही क्षणांतच माजलगाव शहरात वाऱ्यासारखी पसरली.माहिती मिळताच माजलगाव ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.तसेच, तात्काळ आजूबाजूच्या पोलीस ठाण्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू असून,बीड येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागच्या पथकानेही घटनास्थळी भेट देत तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

दिवसा-ढवळ्या घडलेल्या घटनेने व्यापारी व नागरिकांमध्ये भीती,रोष

या घटनेनंतर माजलगाव शहर व परिसरातील सराफा व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहर व ग्रामीण पोलीस ठाण्यांच्या हद्दीत चोरी व दरोड्याच्या घटना वाढत असल्याने, नागरिकांमध्ये पोलिसांच्या कार्यक्षमतेबाबत नाराजी व्यक्त केली जात असून,कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

## तुलसी इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा जल्लोषात विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी वेधले बीडकरांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ जानेवारी**

पालक नशीबवान आहेत की त्यांची मुले अशा शाळेत शिक्षण घेत आहेत, जिथे खऱ्या अर्थाने शिक्षणाची जाण जपली जाते. रोडे सरांच्या दूरदृष्टीमुळेच या संस्थेतून सुसंस्कृत व जबाबदार पिढी घडत आहे. जिथे शिक्षणाचे मूल्य जपले जाते, तिथेच मुले खऱ्या अर्थाने घडतात, असे गौरवपूर्ण प्रतिपादन जिल्हा परिषद बीडचे उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे यांनी केले.

येथील तुलसी इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. पांगरी रोडवरील सौभाग्य लॉन्स येथे रंगलेल्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.अर्जुन राठोड, प्रा.राम गायकवाड, प्रा.भारत मगर,प्रा.प्रदीप गाडे, आयु.दीपा रोडे, प्रा.अकांक्षा सोनवणे, प्रा.शिवराम शिवगिरे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपशिक्षणाधिकारी सोनवणे यांनी आपल्या मार्गदर्शनात प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचा दाखला देत विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मंत्र सांगितला. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात काकदृष्टी, बकध्यानम्, श्वाननिद्रा, अल्पभोजी व गृहत्यागी ही पाच लक्षणे अंगीकारली पाहिजेत. ही मूल्ये विद्यार्थ्याला शिस्तबद्ध बनवून मातृभूमीच्या सेवेसाठी सदैव तत्पर ठेवतात, असे त्यांनी नमूद केले.

स्नेहसंमेलनात शाळेच्या चिमुकल्यांपासून ते माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. देशभक्तीपर गीते, कोळीगीते, लावणी तसेच आदिवासी नृत्य सादरीकरणांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. पारंपरिक व विविध वेशभूषांमधून विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे प्रभावी दर्शन घडवले.आपल्या पाल्यांना रंगमंचावर कला सादर करताना पाहून पालकांच्या चेहऱ्यावर समाधान ओसंडून वाहत होते. सौभाग्य लॉन्सचा परिसर विद्यार्थ्यांच्या जयघोषाने व टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला. शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर व संपूर्ण शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे हा सोहळा अत्यंत यशस्वी ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करून राष्ट्रगीताने या अविस्मरणीय सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## गुन्हेगारांचे कर्दनकाळ ठरलेले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना पत्रकार संघाचा महाराष्ट्राचे राजरत्न हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ जानेवारी**

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारांचे खऱ्या अर्थाने कर्दनकाळ ठरलेले पहिले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने महाराष्ट्राचे राजरत्न - २०२६ हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पोलीस प्रशासनामध्ये सन २०१७ मध्ये देशसेवेचे स्वप्न उराशी घेऊन नवनीत कॉवत हे लोणावळा येथे एसडीपीओ म्हणून रुजू झाले. मेहनत आणि संघर्ष यावर ते धाराशिवचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक झाले. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस उपायुक्त म्हणून त्यांनी कार्य केले. बीड जिल्हा संवेदनशील टप्प्यावर असताना २१ डिसेंबर २०२४ पासून त्यांनी पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारला. अवघ्या एक वर्षाच्या कालावधीत त्यांनी बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी मोडीत काढली असून बीड जिल्ह्यातील जातीय द्वेष आणि अशांतता दूर करत पुन्हा एकदा बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक सलोखा उभा करण्याचे अवघड काम त्यांनी लिलयारित्या पार पाडले आहे.

आई शिक्षिका आणि वडील भारतीय रेल्वेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्या आदर्श विचारांवर त्यांनी सुरू केलेले प्रशासकीय कामकाज उल्लेखनीय आणि प्रशसनीय आहे. याकरिताच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने महाराष्ट्राचे राजरत्न - २०२६ हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला असल्याचे पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. सन्मानाचा हा राज्यस्तरीय पत्रकार संघाचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पोलीस प्रशासनासह बीड जिल्हा प्रशासन आणि सर्व स्तरातून पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे अभिनंदन होत आहे.

## प्रजासत्ताक दिनी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ जानेवारी**

भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ सकाळी ०९.१५ वाजता दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी पोलिस मुख्यालय, कवायत मैदान, नगर रोड बीड येथे बाबासाहेब पाटील, मंत्री, सहकार, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमास सकाळी ८.३० वाजेपूर्वी सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

मंत्री महोदय यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.रविवार दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी रात्री. ०८:३० वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथे आगमन व राखीव. सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी, ०८:४५ वा. शासकीय विश्रामगृह बीड येथून पोलिस मुख्यालयाकडे मोटारीने प्रयाण, सकाळी ०९:१० वा. पोलिस मुख्यालय बीड येथे शासकीय ध्वजारोहण समारंभ व इतर शासकीय कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १०:४५ वा. शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव.दुपारी १२:३० वा. बीड येथून नेकनूर मार्गे चाकरवाडी ता.बीड कडे मोटारीने प्रयाण. दुपारी ०१.:१५ वा. चाकरवाडी ता.जि. बीड येथे आगमन व माऊली महाराज यांच्या समाधीचे दर्शन. दुपारी ०१:४५ वा. चाकरवाडी ता.जि. बीड येथून केज - अंबाजोगाई मार्गे अहमदपुर कडे मोटारीने प्रयाण.

## बीड आगारात 'चालक दिन' उत्साहात साजरा; उत्कृष्ट व अपघातमुक्त चालकांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ जानेवारी**



बीड आगारात शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी २०२० रोजी चालक दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कांडगिरे मॅडम (यंत्र अभियंता, चालन विभागीय कार्यशाळा, बीड) होत्या.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक कार्यालयाचे परिवहन अधिकारी, तसेच बीड वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जाधवर साहेब उपस्थित होते. यावेळी आगारप्रमुख सतीश तिडके, स्थानक प्रमुख भीम किरण बनसोडे, कार्यशाळा अधीक्षक गणेश सोनार, वाहतूक निरीक्षक सौ. ज्योती नागरगोजे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक शिशिरकुमार वाघमारे, यादव साहेब आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी तसेच अपघातमुक्त सेवा देणाऱ्या चालकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये चालक ढाकणे, नागरगोजे, कोरडे, मधुकर सानप, संतोष कांबळे, राजू शेख, घरत आदी चालकांचा समावेश होता.

यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी जावळे साहेब यांनी चालक व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पोलीस उपनिरीक्षक जाधवर यांनी वाहतुकीचे नियम, शिस्त आणि चालक हा देशाच्या दळणवळण व्यवस्थेचा कणा असल्याचे महत्त्व पटवून दिले.

अध्यक्षीय भाषणात यंत्र अभियंता कांडगिरे मॅडम यांनी एसटी चालकाचे महामंडळातील अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट करत, जानेवारी महिन्यात चालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली व सर्व चालक व कर्मचाऱ्यांना चालक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ससाने सुरेश (लिपिक, बीड आगार) यांनी केले, तर आभार प्रदर्शन आगारप्रमुख खिडके साहेब यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वरिष्ठ लिपिक दिसले सर, सचिन होले, चंदू दराडे यांनी विशेष सहकार्य केले.

या कार्यक्रमास बीड आगारातील सर्व चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी तसेच अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोटविकार, कावीळ व लिव्हर आजारांवर तज्ञ सल्ला; बीडमध्ये विशेष उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ जानेवारी**

वाढत्या पोटविकार व लिव्हर आजारांच्या पार्श्वभूमीवर बीड येथील एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलच्या वतीने नागरिकांसाठी एक महत्त्वपूर्ण आरोग्य उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत प्रसिद्ध पोटविकार व लिव्हर तज्ञ डॉ. अक्षय कुलकर्णी हे मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत रुग्ण तपासणीसाठी हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहणार आहेत.

या विशेष सेवेद्वारे पोटविकारांचे लवकर निदान व योग्य उपचार करण्यात येणार आहेत. पोटात किंवा छातीत जळजळ होणे, उलटी, संडासमध्ये रक्त पडणे, कावीळ, लिव्हर सिरोसीस, लिव्हरशी संबंधित इतर आजार, हिपॅटायटिस बी व सी, पित्ताशय किंवा पित्तनलिकेतील खडे, तसेच गिळण्यास त्रास होणे अशा तक्रारी असलेल्या रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## चाटे स्कूल मध्ये माता पालक मेळावा व हळदी कुंकाचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२५ जानेवारी**



चाटे स्कूल केजमध्ये दिनांक : २३/०१/२०२६ रोजी ठिक ०१:०० वाजता माता पालक मेळावा व हळदी कुंकाचा कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून केज शहराच्या नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड मॅडम उपस्थित होत्या तर प्रमुख म्हणून श्री. हनुमंत भोसले सर उपस्थित होते. या कार्यक्रमाला उपस्थित माता पालकांना संक्रांतीचे महत्व व पालकत्वाची जबाबदारी याबद्दल श्री. हनुमंत भोसले सर यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ. सिताताई बनसोड यांनी महिलांशी संवाद साधला. या कार्यक्रमाला खुप मोठ्या प्रमाणात माता पालक उपस्थित होते, माता पालकांच्या विविध खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या व त्यांना बक्षीस वितरीत करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवर्ग यांनी खुप मोठे नियोजन केले होते या कार्यक्रमाला उपस्थितांचे संस्थेचे सचिव श्री. शिवाजी चाटे यांनी आभार मानले व कार्यक्रमाचा समारोप झाला.

## बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा ; ना.पंकजाताई मुंडे डी. लिट. पदवीने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**पुणे दि.२५ जानेवारी**



राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाने आज शैक्षणिक क्षेत्रातील मानाची डी लिट (मानद डॉक्टरेट) पदवी देऊन सन्मान केला. या गौरवाने बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

लोहगांव येथील अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाचा दहावा दीक्षांत समारंभ आज मोठया थाटात पार पडला. ना. पंकजाताई मुंडे यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. ना. पंकजाताई मुंडे हया राज्य मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री असून पर्यावरण व पशुसंवर्धन खात्यामार्फत गेल्या वर्षभरात अनेक लोकाभिमुख निर्णय त्यांनी घेतले आहेत, याशिवाय सामाजिक कार्यातही त्या सातत्याने अग्रेसर असतात. या कार्याची दखल घेऊन विद्यापीठाने त्यांचा शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी 'मानद डॉक्टरेट' (डी.लिट.) देऊन आज सन्मान केला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# वगरवाडी शिवारात ऊसाचे टिपर घेऊन जाणारे ट्रॅक्टर झाले पलटी

## औंढा नागनाथ ते परभणी रस्त्यावर दोन तास वाहतुक ठप्प



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**

औंढा नागनाथ ते परभणी जाणाऱ्या मार्गावर औंढा नागनाथ तालुक्यातील वगरवाडी जवळ मंठ्यावरून उसाचे टिपरे घेऊन जवळा बाजार येथील कपिलेश्वर बाराशिव साखर कारखान्याकडे जाणारे ट्रॅक्टर क्रमांक एमएच ३८ एडी ४७७१ या ट्रॅक्टर वाहनाची उसाने भरलेल्या ट्रॉलीची हेड सोबत जॉईंट केलेली चाबी अचानक तुटली यानंतर ट्रॉली मागे सरून रस्त्याच्या मधोमध पलटी झाली.

ही घटना २५ जानेवारी रोजी सकाळी साडेअकरा वाजे दरम्यान घडली. रस्त्याच्या मधोमध उसाच्या टिपऱ्याने भरलेली ट्रॉली पलटी झाल्याने दोन्ही बाजूने येणारी वाहतूक ठप्प झाली. यानंतर ग्रामस्थांनी ही माहिती मिळताच पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भगत, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पंजाब थिटे,जमादार गजानन गिरी, इमरान सिद्दिकी,महामार्ग पोलीस राजाराम कदम,कैलास आडे,सह पोलीस कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. यानंतर जेसीबीच्या साह्याने रस्त्यावरील ट्रॉली बाजूला करण्यात आली. तोपर्यंत वाहनाच्या तीन किलोमीटर रांगा लागल्या होत्या. यानंतर पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली. दरम्यान या ठिकाणी असलेल्या खड्ड्यामुळे व चढाचा रस्ता असल्यामुळे ट्रॅक्टर ट्रॉलीची चावी तुटली आणि ट्रॉली पलटी झाली. यावेळी ट्रॅक्टरमध्ये चालक उमाजी कुसळे राहणार खांडेगाव हे एकटेच होते. त्यांना कोणतीही दुखापत झाली नाही. मात्र ट्रॅक्टरच्या ट्रॉलीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. रस्त्यावर ऊस सांडल्याने उसाचा रस निघाला. त्या उसाच्या टिपऱ्यावरून अनेक दुचाकी वाहने घसरले असून वाहनधारक जखमी झाले.

# अभाविपच्या शोभा यात्रेचे ठिकठिकाणी जंगी स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद परिषदेच्या साठव्या अधिवेशनानिमित्त शनिवार दि २४ जानेवारी रोजी संपूर्ण देवगिरी प्रांतातून आलेल्या कार्यकर्ते व प्राध्यापकांनी हिंगोली शहरातून भव्य शोभायात्रा काढली. या शोभायात्रेत देशभक्तीपर दिलेल्या घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून निघाले होते. तर हिंगोलीकरांनी देखील ठिकठिकाणी या शोभा यात्रेचे जंगी स्वागत केले.

शुक्रवारपासून हिंगोली येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे हिरक महोत्सवी साठवे अधिवेशन सुरू झाले आहे. अधिवेशनाच्या शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला वंदन करून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ही शोभायात्रा पोस्ट ऑफिस, जवाहर रोड, इंदिरा गांधी चौक, बुरुड गल्ली, कपडा गल्ली मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून गांधी चौकात समर्पित करण्यात आली. भारत माता की जय, वंदे मातरम, छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, विद्यार्थी परिषद जिंदाबाद अशा घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून निघाले होते. या शोभा यात्रेचे पुष्पवृष्टीने शहरातील गांधी चौकात भाजपच्यावतीने स्वागत करण्यात आले. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, उपाध्यक्ष संजय ढोके, सरचिटणीस उमेश नागरे, मिलींद यंबल, बाबा घुगे, प्रशांत सोनी, कैलाश शहाणे, माणिक लोडे, सुनील राठौर, पवन उपाध्ये, सुभाषचंद्र लदनिया, ज्ञानेश्वर मामडे, जैस्वाल, धायतडक, महेश शहराणे, अग्रवाल यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या शोभायात्रेचे नेतृत्व प्रा. डॉ. सुरेश मुंढे, अभाविप प्रदेश अध्यक्ष डॉ. वरुणराज नन्नवरे, अभाविप प्रदेश मंत्री, देवगिरी प्रदेश कु. पायल किनाके, अभाविप राष्ट्रीय मंत्री, कु. वैभवी ढिवरे, अभाविप राष्ट्रीय कार्यसमिती सदस्यांनी केले.

# पारंपारीक पध्दतीने श्री नागनाथ प्रभूंच्या रथाची पूजा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**



दरवर्षीप्रमाणे नागनाथ मंदिरात महाशिवरात्री उत्सवाची तयारी रविवारपासून (ता.२५) सुरूवात झाली आहे. रथसप्तमीनिमित्ताने आठवे ज्योतिर्लिंग श्री नागनाथ प्रभूच्या रथाची पूजा करुन मंदिराला प्रदक्षिणा घालण्यात आली. मकर संक्रांतीनंतर येणारी सप्तमी म्हणजेच रथ सप्तमीनिमित्त श्रींच्या रथाची स्वच्छता करण्यात आली. रथाची पूजाअर्चा करून रथगृहातून रथ बाहेर काढण्यात आला. देवस्थानचे पदसिद्ध सल्लागार तथा आमदार संतोष बांगर व देवस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे, विश्वस्त ॲड श्रीधर घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली रथाची पूजा देवस्थानचे अध्यक्ष वैजनाथ पवार व व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, मुख्य पुजारी तुळजादास भोपी यांनी केली. यावेळी, गार्ड प्रमुख बबन सोनुने, महंत शामगीर महाराज, पुरोहित कृष्णा ऋषी, जीवन ऋषी, नवनाथ देशमुख, मंगेश गुरव, रामप्रसाद उदगिरे,संजय मोरे, नागेश माने, कृष्णा पाटील, गणेश उदगिरे,दत्तात्रय शेगुकर, राजू गिरी, प्रशांत स्वामी, बसवेश्वर स्वामी, सुबोध देशपांडे, अभिषेक गोरे, अभिजित लोखंडे, गणेश जगताप, मुकेश पडोळे, नितीन देशमुख, देवा देशमुख, जितेंद्र नेवल, गणेश उदगिरे दसरथराठोड विजय ठाकूर, जगदेव दिंडे, कुमार स्वामी, राजू वाकोडे, माधव गोरे, नागेश गोरे यांच्यासह मंदिरातील पुजारी, पुरोहित देवस्थानचे कर्मचारी व शिवभक्त उपस्थित होते.



**हिंगोली– येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात कवि संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुमन दुबे लिखित सत्रहवाँ श्रृंगार या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापूरकर, भ मा परसवाळे, नगराध्यक्षा सौ रेखा बांगर, डॉ मार्तंड कुलकर्णी, माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार, कवी केशव खटींग, प्रा शेखर गिरी, गोपाल दुबे, सुमन दुबे करण्यात आले. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### श्रीमती सुमती मुळे यांचे निधन



हिंगोली– स्नेह विकास कॉलनी शिवाजीनगर हिंगोली येथील सुमती सुधाकरराव मुळे (७९) यांचे २४ जानेवारी २०२६ ला दुपारी ३ वाजता निधन झाले. त्यांच्यावर २५ जानेवारी २०२६ ला अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, जावई, नातू असा परिवार आहे. सुधीर मुळे उप सरव्यवस्थापक ओमप्रकाश देवडा पीपल्स को–ऑपरेटिव्ह बँक हिंगोली यांच्या त्या मातोश्री होत्या.

{XA}

### जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने मकर संक्रांत साजरी



हिंगोली– छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात जिजाऊ ब्रिगेडचे स्नेहमीलन आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात महिलांनी बाल विवाह थांबवण्याची प्रतिज्ञा घेतली. तसेच समाजात या अनिष्ठ रूढी विरोधात जन जागृती करून बाल विवाह पूर्णतः थांबवण्याचा निश्चय केला. बाल विवाहाचे दुष्परिणाम तसेच मुलींचे आरोग्य या संदर्भात जागृती करण्यात आली. माहिती पुस्तिका व पुस्तकांचे वाटप करण्यात आले. जिजाऊ ब्रिगेड कडून वैचारिक वाण देण्यात आले. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश उपाध्यक्ष ज्योतीताई कोथळकर, विभागीय सचिव अर्चना मेटे, जिल्हाध्यक्ष प्रियंका भोयर, योगिता देशमुख, स्मिता दळवी, सालोखा इंगोले, सुनिता भालेराव, कांताबाई कल्याणकर, संजीवनी पडोळे, सुरेखा जगताप, अंजली गाडे, छाया मुधोळ, मंगल नवले, अर्चना वाघ, स्वाती कऱ्हाळे, स्वाती गाढवे, कल्पना नीलकंठे, विमल व्होगे, सरस्वती कोरडे, मीरा कोरडे, कुंता लोखंडे यांच्या सह अनेक महिला सहभागी झाल्या.

### बोराळा येथे तंबाखुमुक्तीसाठी आज प्रतिज्ञा

हिंगोली– वसमत तालुक्यातील बोराळा येथील जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त दि. २६ जानेवारी रविवारी तंबाखूमुक्तीची प्रतिज्ञा देण्यात येणार आहे. नशामुक्त भारत अभियान अंतर्गत, नशामुक्त भारत अभियान समिती, गटशिक्षणाधिकारी कार्यालय–वसमत, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय दिनाच्या औचित्याने तंबाखूमुक्ती प्रतिज्ञा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा संघटक विशाल अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे मुख्याध्यापक, शाळा समितीनच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रतिज्ञा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

# जिजामाता बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षपदी आ. तान्हाजी मुटकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**

येथील जिजामाता बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व शिक्षण संस्थेची नुकतीच निवडणुक पार पडली. यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी बिनविरोध अध्यक्षपदी निवड झाली आहे.

जिल्ह्यातील नामांकीत असलेल्या या संस्थेची निवडणुक बिनविरोध पार पडली असून अध्यक्षपदी आ. तान्हाजीराव मुटकुळे, उपाध्यक्ष–उत्तमराव जगताप, सरचिटणीस–ग्यानदेव जगताप, कोषाध्यक्ष–दिलीप चव्हाण, सहचिटणीस–प्रकाश निरगुडे, सदस्यपदी–शीलचंद देशमुख, डॉ मल्हारी ढेंगळे, शिवाजी जगताप, बालाजी गलंडे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

निवडीनंतर सर्व पदाधिकाऱ्यांचा आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला. यावेळी सुखदेवानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच भापजचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीगुरू तेग बहादूरजी साहिब यांना विद्यार्थ्यांकडून अनोखी मानवंदना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**



शीख धर्माचे ९ गुरू श्री गुरू तेगबहादूरजी साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे औचित्य साधून हिंगोली येथील जिल्हा परिषद मैदानावर शिक्षण विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांनी मानवी साखळी करून अनोखी मानवंदना दिली. या उपक्रमातून श्रीगुरू तेग बहादूरजींच्या महान बलीदानाचे स्मरण करीत सामाजिक ऐक्य आणि सहिष्णुता संदेश देण्यात आला.

येथील जिल्हा परिषदेच्या मैदानावर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी शिक्षणाधिकारी संदीपकुमार सोनटक्के, गटशिक्षणाधिकारी दत्ता नांदे, केंद्रप्रमुख शेषराव आसोले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनी संचलन, कवायत आणि नंतर मानवी साखळीद्वारे हिंद–दी–चादर तयार करून श्रीगुरू तेगबहादूरजी यांना आदरांजली वाहीली. यावेळी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार यांच्यासह विविध शाळांचे शिक्षकांची उपस्थिती होती.

# वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे २७ जानेवारीला हिंगोली राज्य अधिवेशन, राज्यभरातून शेकडो वृत्तपत्र विक्रेते उपस्थित राहणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय अधिवेशन व वार्षिक आमसभा दि. २६ व २७ जानेवारी २०२६ रोजी राज्यस्तरीय अधिवेशन व आमसभा महावीर भवन, रामलिला मैदानासमोर, हिंगोली येथे मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे अशी माहीती महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर वर्धा यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून यासाठी शेकडो वृत्तपत्र विक्रेते उपस्थित राहणार आहेत.

अधिवेशनाचे उद्घाटन २७ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता महाराष्ट्र राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा हिंगोली पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हिंगोलीचे आमदार तानाजीराव मुटकूळे असणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून हिंगोलीचे आ. हेमंत पाटील व हिंगोलीचे खा. नागेश पाटील आष्टीकर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर, कार्याध्यक्ष बालाजी पवार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी, कोषाध्यक्ष राजेंद्र टिकार, ज्येष्ठ सल्लागार शिवगोंडआण्णा खोत यांच्याबरोबरच आमदार संतोष बांगर, आमदार राजू नवघरे, माजी आमदार गजानन घुगे, माजी खासदार शिवाजीराव माने, माजी मंत्री जयप्रकाश दांडेगांवकर, हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेचे सीईओ विवेक गायकवाड, नगरपालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे, जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बी.डी. बांगर, हिंगोलीच्या नगराध्यक्षा रेखाताई बांगर, कळमनुरीच्या नगराध्यक्ष श्लेषा चौधरी, वसमतच्या नगराध्यक्षा सुमनबाई बाहेती हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. याशिवाय काँग्रेस नेते रामदास पाटील नांदेड, डॉ. मुरलीधर तोष्णीवाल हिंगोली, पत्रकार वसंत भट, गजानन काळे, संपादक विजय दगडू लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी प्रसाद आर्वीकर, राज्य संघटना व्यवस्थापन समिती सदस्य संजय पावसे मुंबई, दत्ता घाडगे ठाणे, गोपाळ चौधरी जळगाव, राज्य संघटनेचे विभागीय उपाध्यक्ष दिनेश उके गोंदिया, संतोष शिरभाते यवतमाळ, अण्णासाहेब जगताप संभाजीनगर, रविंद्र कुलकर्णी मालेगाव, रघुनाथ कांबळे कोल्हापूर, मनोहर परब मुंबई, राजेंद्र मेहता रायगड, विभागीय संघटन सचिव विनोद पन्नासे चंद्रपूर, संजय सातार्डेकर मुंबई, महेश कुलथे नाशिक, प्रकाश उन्हाळे शेगाव, जगदीश उंबरदंड लातूर, शाम थोरात बार्शी व संदीप पानवकर रायगड हे उपस्थित राहणार आहेत.

अधिवेशनात वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्यांवर सखोल चर्चा करण्यात येणार असून स्वतंत्र विक्रेता मंडळाची अंमलबजावणी, पेन्शन योजना, आरोग्य व शिक्षण सुविधा, विक्रेत्यांची अधिकृत नोंदणी, पेपर स्टॉलसाठी जागा उपलब्धता, शासकीय योजनांचा लाभ, वैद्यकीय सुविधा, विक्रेता भवन उभारणी तसेच रेल्वे व एस.टी. प्रवास सवलती आदी मुद्द्यांवर ठराव मांडण्यात येणार आहेत. या राज्यस्तरीय अधिवेशनामुळे वृत्तपत्र विक्रेत्यांच्या समस्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडल्या जाणार असून त्यांच्या हक्कांसाठी संघटनात्मक ताकद वाढीस लागणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

अधिवेशनच्या मुख्य दिवशी २७ जानेवारी रोजी सकाळी साडेआठला प्रभात फेरी होणार आहे. त्यानंतर पहील्या सत्रात अधिवेशन उद्घाटन सोहळा, मान्यवरांचे मार्गदर्शन, विविध चर्चासत्रे होणार आहे. दुसऱ्या सत्रामध्ये राज्य संघटनेची आमसभा दुपारी दोन वाजता होणार आहे. चार वाजता समारोप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनाचे आयोजन श्रमिक वृत्तपत्र विक्रेता संघटना, जिल्हा हिंगोली यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### नळदुर्ग शहर शिवसेनेच्या वतीने स्व. बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी

**नळदुर्ग, दि.२३ जानेवारी -**

नळदुर्ग येथे दि.२३ जानेवारी रोजी शहर शिवसेनेच्या वतीने हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित या कार्यक्रमात सेवानिवृत्त मुख्याध्यापक दत्तात्रय वाघमारे व श्री गवळी यांच्या हस्ते बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शहर शिवसेनाप्रमुख संतोष पुदाले, उपतालुकाप्रमुख सरदारसिंग ठाकुर, उपशहर प्रमुख शाम कनकधर यांच्यासह बसवराज जमादार, बाबासाहेब कटके, प्रमोद कोकणे, सोमनाथ म्हेत्रे, चंदू सगरे, ओमकार कलशेट्टी, दशरथ ठाकुर, लक्ष्मण अंगुळे, रवी गायकवाड आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विशाल जाधव यांची मुंबई कारागृह पोलीसपदी निवड

**इटकळ, दि.२३ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मौजे शिरगापूर येथील शेतकरी पुत्र विशाल शिवाजी जाधव यांनी प्रतिकूल परिस्थितीवर



मात करत वडिलांचे पोलीस होण्याचे स्वप्न पूर्ण करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिद्द, चिकाटी, मेहनत, आत्मविश्वास आणि सातत्य यांच्या जोरावर अशक्यही शक्य होते, हे विशाल जाधव यांनी आपल्या यशातून दाखवून दिले आहे. विशाल शिवाजी जाधव यांची मुंबई कारागृह येथे पोलीस पदी निवड झाल्याने शिरगापूर गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.



### 'जवाहर'मध्ये कॉपीमुक्त शपथ

**अणदूर, दि.२३ जानेवारी -**

जवाहर विद्यालय, अणदूर येथे (दि.२२ जानेवारी) इ.१० वी विद्यार्थ्यांना परीक्षेस गैरहजर राहणार नाही व परीक्षेत कॉपी करणार नाही याची शपथ देण्यात आली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यालयातील सुभाष गळाकाटे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेस गैरहजर राहणार नाही, परीक्षेत कॉपी करणार नाही, अशी सामुदायिक शपथ दिली,परीक्षा पध्दतीमध्ये झालेल्या आमुलाग्र बदलाची माहिती दिली. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, परीक्षार्थी विद्यार्थी उपस्थित होते.

### रमणलाल शहा यांचे निधन

**परंडा, दि.२३ जानेवारी -**

परंडा येथील प्रतिष्ठित नागरिक, सर्वपरिचित कौटुंबिक



स्नेही, ज्येष्ठ कापड व्यापारी तसेच श्री जैन मंदिराचे माजी उपाध्यक्ष रमणलाल बन्सीलाल शहा यांचे अल्पशा आजाराने बुधवार, दि.२१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७.३६ वाजता निधन झाले. ते कापड व्यापारी सुयोग शहा यांचे काका होत. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार असा मोठा परिवार आहे.

### विजयकुमार यादगिरे यांचे निधन

**नळदुर्ग, दि.२३ जानेवारी -**

मराठवाडा मुक्ती संग्राम आंदोलनातील स्वातंत्र्यसैनिक स्व. बाबुराव यादगिरे यांचे जेष्ठ चिरंजीव तसेच नळदुर्ग



येथील विविध वृत्तपत्रांचे एजंट भारत यादगिरे यांचे जेष्ठ बंधू, सेवानिवृत्त आदर्श शिक्षक विजयकुमार यादगिरे यांचे शुक्रवार दि.२३ जानेवारी रोजी रात्री दोन वाजण्याच्या सुमारास निधन झाले. विजयकुमार यादगिरे हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्यावर सोलापूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक विवाहित मुलगी, भाऊ, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### शेळगाव गटात भाजपाचे शक्तीप्रदर्शन

**परंडा, दि.२३ जानेवारी -**

परंडा तालुक्यातील जि.प. शेळगाव गटातून प्रथमच भाजपाचे जोरदार शक्तीप्रदर्शन करीत उमेदवार शरद पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाने ही निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढण्याची तयारी केली असून शेळगाव गटात प्रस्थापितांसमोर पवार यांनी कडवे आव्हान उभे केले आहे. त्यामुळे विरोधकांचे धाबे दणाणल्याचे चित्र दिसून येत आहे.

# धाराशिवात सोळावा राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

आज छत्रपती शिवाजी हायस्कूल, धाराशिव येथे सोळावा राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे यांची तसेच शेतकरी नेते उद्धवराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात झाली. यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन झाले व उपस्थितांनी मतदार म्हणून सामूहिक शपथ घेतली.

विद्यार्थ्यांसाठी प्रा. रवि सुरवसे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले, चित्रपटातील हिरो पैसे कमावतात; पण देशासाठी संपूर्ण आयुष्य अर्पण करणारे महापुरुष हे खरे सुपरहिरो आहेत. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकत जीवनातील यशस्वी होण्यासाठी प्रेरणा दिली.

शिक्षण विस्तार अधिकारी भारत देवगुडे यांनी राष्ट्रीय मतदार दिवस व भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच मतदार हा राज्यघटनेने दिलेला मौलिक अधिकार असून प्रत्येक मताची किंमत अनमोल असल्याचे अधोरेखित केले.

गट शिक्षणाधिकारी असरार पठाण यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मतदार दिनाचे महत्त्व पटवून देत लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचे महत्त्व सांगितले.



यानंतर मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली, ज्यास गट शिक्षणाधिकारी असरार पठाण व एम.डी. देशमुख यांनी हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली.

कार्यक्रमास मतदार जनजागरण समितीचे सदस्य, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक आनंद वीर यांनी केले तर आभार प्राचार्य पाटील यांनी मानले.

## कानेगाव जि.प.साठी निता अनिल जगताप यांचा अपक्ष लढा



**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

कानेगाव जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार सौ. निता अनिल जगताप यांच्यासाठी शेतकरी नेते अनिल जगताप यांनी झंझावती दौऱ्याला सुरुवात केली असून उंडरगावमध्ये शेतकरी व नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या.

महाविकास आघाडीने उमेदवारी नाकारल्यानंतर अनिल जगताप यांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला असून, मतदारसंघात त्यांच्या प्रति प्रचंड सहानुभूतीची लाट निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

धाराशिव जिल्हा, लोहारा-उमरगा तालुक्यांना शेकडो कोटींचे पिक विमा व अतिवृष्टी अनुदान मिळवून देणारे शेतकरी नेता अनिल जगताप यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने एबी फॉर्म दिला नाही. ४० वर्षे निष्ठापूर्वक पक्षाचे काम केले असतानाही फॉर्म न मिळाल्यामुळे त्यांनी अपक्ष लढण्याचा मार्ग निवडला आहे.

अनिल जगताप यांनी सन २०२४ मध्ये ८० हजार शेतकऱ्यांसाठी ८६ कोटी ४६ लाख ३४ हजार रुपये अतिवृष्टी अनुदान मिळवून दिले. तसेच शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी आंदोलनांमध्ये पुढाकार घेतला आहे.

कानेगाव मतदार संघात एकूण २३,५४४ मतदान आहेत आणि प्रत्येक गावात अनिल जगताप यांना भक्कम पाठिंबा मिळत आहे. त्यांच्या समाजकारणावर भर असल्याने शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने त्यांच्याकडे आकर्षित झाला आहे.

त्यांना अधिकृत चिन्ह २७ तारखेला मिळणार असून, त्यानंतर ते घरोघरी जाऊन प्रचार करणार आहेत.

## जिल्हास्तरीय आश्रम शाळा क्रीडा स्पर्धा यमगरवाडीतील विद्यार्थ्यांचे यश

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

इतर मागास बहुजन कल्याण विभाग सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण आयोजित धाराशिव जिल्हा आश्रमशाळा क्रीडा महोत्सव सन २०२५-२०२६ या क्रीडा स्पर्धा शिंगोली आश्रम शाळा धाराशिव येथे नुकत्याच रोजी पडल्या स्पर्धेमध्ये आपल्या एकलव्य विद्या संकुलातील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्तम कामगिरी करून यश संपादन केले.

एकलव्य विद्या संकुलातील खेळाडूंनी १७ वर्षे वयोगट मुलांच्या कबड्डी संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. १४ वर्षे वयोगट मुला मुलींमध्ये लांब उडी मानसी मोहिते प्रथम क्रमांक, अबोली माने तृतीय क्रमांक, १०० मीटर धावणे अबोली माने प्रथम क्रमांक, ओमकार गंदेवाड-प्रथम क्रमांक,२०० मीटर धावणे विश्वजीत जाधव प्रथम क्रमांका असे क्रमांक मिळवणे संपादन केले. विजय सर्व खेळाडूंचा इतर मागासवर्ग प्रादेशिक उपसंचालक लातूर तेजस माळवतकर व इतर मागास बहुजन कल्याण विभाग सहायक संचालक अमोल ताकभाते यांच्या हस्ते सामाजिक न्याय भवन धाराशिव येथे सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला खेळाडू तसेच लातूर प्रादेशिक कार्यालयातील सचिन नटवे, विकास राठोड, व्याख्याते डॉ. भैरवनाथ कानडे, विठ्ठल म्हेत्रे, माऊली भुतेकर, रमाकांत पवार, यशवंत निंबाळकर, माऊली भुतेकर, तात्याराव चव्हाण, अनिल खताळ, शिंदे, माजी मुख्याध्यापक जगताप दादा, दयानंद राठोड व इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## शेत गटांतील विद्युत मापकाचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

घाटनांदुर शिवारातील शेत गट नं. ६८०, ६५१ व ८४३ येथे ४ पोलीवरील विद्युत मापक स्काडा केबल अज्ञात व्यक्तीने तोडले. यामुळे कंपनीला अंदाजे ३,०६,५४९ चे नुकसान झाले.

फिर्यादी अमोल आश्रुबा मोटे (वय ४१, रा. गिरवली, ता. भुम, जि. धाराशिव) यांनी दि.२२ जानेवारी रोजी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## वाशी : भाजपच्या सर्व जागेवर उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**

**वाशी, दि.२३ जानेवारी -**



वाशी तालुक्यातील पारगाव, पारा आणि तेरखेडा या तीन गटांतून पंचायत समितीच्या सहा गणांसाठी उमेदवारांची नोंदणी सुरु आहे. भारतीय जनता पक्षाने (भाजप) प्रत्येक गटात आपले उमेदवार अर्ज दाखल केले आहेत.

पारगाव गट : आखाडे आशा महादेव, कोकणे लक्ष्मी सुशांत, सरमकुंडी गट : क्षीरसागर नयना विश्वास, ठाकूर प्रिया प्रदीप सिंह, पारा गट : लोकरे रूपाली सुजित, लोकरे संगीता महादेव, भराटे दादाराव रामभाऊ, बावी गट : शिंदे संजय मच्छिंद्र, इंदापूर गट : घोडके सुवर्णा संदीपान तेरखेडा गट : घुले प्रवीण बिबीशन, पाटील उज्वला आनंद, घुले मोहिनी प्रवीण यांनी अर्ज भरला आहे.

भाजप तालुकाध्यक्ष राजगुरू कुकडे यांनी सांगितले की, जर युती झाली तर युतीतून लढा देता येईल, अन्यथा भाजप सर्व गटातून स्वतंत्र उमेदवार मैदानात ठेवण्यास तयार आहे. त्यामुळे प्रत्येक गटात आणि गणात तणावपूर्ण पंचरंगी सामना होण्याची शक्यता आहे.

## नेताजी हे स्वतंत्र संग्रामाचे महानायक : व्यंकट वचने

**तभा वृत्तसेवा**

**उमरगा, दि.२३ जानेवारी -**

नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रणी सेनापती म्हणून अत्यंत महत्त्वाची व निर्णय भूमिका बजावली. त्यामुळे आपला देश स्वतंत्र झाला. त्यांच्या धाडसी वृत्तीमुळे इंग्रजांना सळो की पळो करुन सोडले होते. त्यामुळे त्यांची दखल घेऊन इंग्रजांची पळता भुई थोडी झाली होती, असे प्रतिपादन व्यंकट वचने यांनी केले.

स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये महानायक नेताजी सुभाष चंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून वचने बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सविता लोहार या होत्या.



याप्रसंगी विवेक जाधव, नागनाथ तांबुळे, बेबी सरोजा पवार, महेश कुलकर्णी, अविनाश जोशी आदीसह विद्यार्थी उपस्थित होते. पुढे बोलताना वचने म्हणाले की, इंग्रजांच्या जुलमी राजवटीच्या विरुद्ध अत्यंत धाडसाचे काम नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी केले.

अशा महामानवाचे जयंती साजरी करत असताना आजच्या विद्यार्थ्यांनी अशा व्यक्तिमत्त्वापासून बोध घेऊन आपल्या जीवन कार्यामध्ये त्यांचं आचरण करावे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विवेक जाधव यांनी मानले.

## तामलवाडी येथे इंडस टॉवरच्या फायबरची चोरी

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

तामलवाडी येथे एअरटेलचे फायबर अंदाजे ४०,००० रूपये किमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरी केले.

फिर्यादी महादेव पंडीत ढवण (वय ४२, रा. खंडाळा, ता. तुळजापूर) यांनी दि. २२ जानेवारी रोजी तामलवाडी पोलीस ठाण्यात प्रथम तक्रार दिल्यानंतर, पोलीस ठाण्यात भारतीय दंडसंहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## गुरु तेग बहादूर साहीबजी यांच्या विचारांची प्रेरणा घेण्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहावे : महंत जितेंद्र महाराज

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.२३ जानेवारी -**

सर्व समाजासाठी बलिदान देणारे हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा इतिहास अबाधित राहावा, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून नांदेड येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाला जिल्ह्यातील बंजारा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पोहरादेवी येथील धर्मपीठाचे महंत जितेंद्र महाराज यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज हिंद दी चादर गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर बंजारा समाज बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती.



या बैठकीत महंत जितेंद्र महाराज बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

महंत जितेंद्र महाराज म्हणाले की, गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा गौरवशाली इतिहास येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. नांदेड येथे होणारा कार्यक्रम हा जागतिक स्तरावरील असून देशाच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने भाविक व अनुयायी सहभागी होत आहेत. त्यामुळे या कार्यक्रमाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी सांगितले की, गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या कार्यात त्या काळात विविध समाजांचे लोक सहभागी होते. दानशूर व्यक्ती व प्रशासनाच्या समन्वयातून नागरिकांसाठी वाहन व्यवस्थेचे नियोजन करण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

या बैठकीस हिंद दी चादर क्षेत्रीय आयोजन समितीचे संतोष चव्हाण, ॲड. प्रवीण पवार, विलास राठोड, विद्यानंद राठोड, दिनेश चव्हाण, शिवाजी राठोड, बाळासाहेब पवार, वसंत पवार, लक्ष्मण राठोड, राहुल राठोड, विनायक राठोड, ज्ञानदेव राठोड, दामाजी राठोड, बी.बी. राठोड, नितीन पवार, नितीन राठोड, गुरुनाथ राठोड व दिनेश राठोड यांची उपस्थिती होती.

## वाशी तालुक्यातील पहिले देहदान... कै. मनीषा निरगुडे यांचा समाजाला वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संदेश



**तभा वृत्तसेवा**

**कळंब, दि.२३ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील सहावे तर वाशी तालुक्यातील पहिले देहदान मंगळवार, दि. २१ जानेवारी रोजी घडून आले असून, या घटनेने समाजासमोर वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी व मानवतेचा आदर्श उभा केला आहे. अंधश्रद्धा व रूढी-परंपरांना छेद देत देहदानाचा प्रेरणादायी निर्णय घेणाऱ्या कै. मनीषा पंडित निरगुडे (वय ४६, रा. पिंपळगाव - लिंगी, ता. वाशी) यांनी मृत्यूनंतरही समाजासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच धाराशिव जिल्हा संप्रदाय यांच्या माध्यमातून कै. मनीषा निरगुडे यांनी आपल्या हयातीतच देहदानाचा ठाम संकल्प केला होता. अल्पशा आजाराने त्यांचे दुःखद निधन झाले. मात्र, निधनापूर्वी काही दिवस त्यांनी आपल्या कुटुंबीयांकडे देहदानाची स्पष्ट इच्छा व्यक्त केली होती.

त्यांच्या या इच्छेचा सन्मान राखत पती पंडित निरगुडे, मुलगी व इतर नातेवाईकांच्या संमतीने त्यांचे पार्थिव धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात देहदान करण्यात आले. या देहदानामुळे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच संशोधन क्षेत्राला मोलाची मदत होणार आहे.

निधनाची माहिती मिळताच धाराशिव जिल्हा संप्रदायचे वाशी येथील माजी जिल्हाध्यक्ष विजय भारती, तालुकाध्यक्ष बंडू पवार, सचिव शिवाजी सारुक यांनी तातडीने पिंपळगाव (लिंगी) येथे भेट दिली. स्थानिक कार्यकर्ते पंडित सुकाळे, विलास कोल्हे, सुधीर निरगुडे, त्रिशाला निरगुडे व अनिता जगताप यांच्या सहकार्याने जिल्हा समिती व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी समन्वय साधत देहदानाची संपूर्ण प्रक्रिया अत्यंत शिस्तबद्ध व सन्मानपूर्वक पार पाडण्यात आली.

या प्रसंगी संप्रदायचे जिल्हाध्यक्ष संतोष केसकर, जिल्हा सचिव कानडे, युवा प्रमुख लक्ष्मी माने यांच्यासह जिल्हा समितीचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

कै. मनीषा निरगुडे यांचे देहदान समाजासाठी दीपस्तंभ ठरले असून, वैज्ञानिक विचार स्वीकारून मानवतेच्या सेवेसाठी देहदान करण्याचा मोलाचा संदेश त्यांनी समाजाला दिला आहे.

त्यांच्या या धाडसी व प्रेरणादायी निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, वाशी तालुक्यात सामाजिक परिवर्तनाची नवी चळवळ सुरू झाल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.